# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. १८/०५/२००७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक १८/०५/२००७ रोजी सभा सुचना क्र. ४ दि. १४/०५/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ६) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ७) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ८) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ९) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| १०) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| ११) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १२) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १३) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १४) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| २) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग यांचे मी हार्दिक स्वागत करतो आणि सभेला सुरुवात करावी अशी मी सचिवांना सुचना करतो.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**रमेश जैन :-**

मा. सभापती साहब के परमिशनसे एक प्रस्ताव रखना चाहता हूँ। सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब इन्होने महानगरपालिका और जिल्हाधिकारी कार्यालयमे चौपाटी के लिए लगातार पत्र व्यवहार किया और उसके कारण मा. जिल्हाधिकरी साहब उन्होने कल जेसल पार्क चौपाटी मिरा भाईंदर महानगरपालिका को सुपुर्त किया है। इसके लिए मै सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहब (काका) का अभिनंदन करता हुँ।

**हंसुकुमार पांडे :-**

मुझे कुछ पुछना है महानगरपालिका के लिए महानगरपालिकेने हस्तांतरण किया या फिर सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहब इन्होने हस्तांतरण किया है? इसका जरा खुलासा किजिए।

**मा. आयुक्त :-**

महानगरपालिकेने हस्तांतर किया है।

**हंसुकुमार पांडे :-**

तो फिर बोर्ड ऐसा लगाया है की, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहब ने महानगरपालिका को हस्तांतर करके दिया है। और नागरिक वह देखके उनका अभिनंदन करते है। ऐसा चौपाटीपर बोर्ड लगाया है। तो इसका मतलब क्या समजना चाहिए। क्या महानगरपालिका कमजोर है? सोहळा करके सब करवाने के लिए क्या महानगरपालिका कमजोर है?

**मा. सभापती :-**

बोर्ड किसने लगाया है?

**हंसुकुमार पांडे :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब ने लगाया है।

**मा. सभापती :-**

खुदने लगाया है या किसने भी लगाया है। लेकिन वह चौपाटीपर बोर्ड लगाया है। यह देखा है। लेकिन एक आदमी के हिसाब से थोडी चौपाटी पास हो सकता है।

**शशिकांत भोईर :-**

यह बोर्ड का प्रश्न नही है।

**हंसुकुमार पांडे :-**

लेकिन मे वही पुछ रहा हु। उसका खुलासा किजिए। मा. आयुक्त साहेब उसका जबाब देंगे। मा. आयुक्त साहब, आप वह पत्र का वाचन किजिए।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, असे आहे की, सर्व सन्मा. सदस्यांनी पाठपुरावा केलेला आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेबांनी सुध्दा पाठपुरावा केलेला आहे. त्यात उपस्थित सगळे सदस्य आहेत. आपल्या महापालिकेने पाठपुरावा केलेला आहे. राष्ट्रवादीने सुद्धा केला आहे. शिवसेनेनेही केला आहे. ह्या सगळ्या पक्षाच्या सदस्यांनी पाठपुरावा केलेला आहे ........

**हंसुकुमार पांडे :-**

सर्व सदस्यांनी जोडून पाठपुरावा केलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब यांना आमची अशी भावना आहे की, तुम्ही बोर्डावर टाकण्याआधी महापालिकेच्या सर्व सदस्यांची नावे टाकले असते किंवा सर्व पक्षाच्या सदस्यांची नाव टाकले असते तर बरे झाले असते.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. आयुक्त साहेब, आपण जरा त्या लेटरचे वाचन करा.

**मा. आयुक्त :-**

कुठल्या लेटरचे वाचन करायचे आहे?

**हंसुकुमार पांडे :-**

आपल्याला हस्तांतराची परवानगी मिळाली होती. त्या लेटरचे वाचन करा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

चौपाटीची जी जागा आहे. ती जागा मा. कलेक्टर साहेबांनी पहिले सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेबांना दिली का? त्यानंतर महापालिकेला हस्तांतर केली आहे का?

**हंसुकुमार पांडे :-**

सन्मा. सदस्य श्री. तुळशीदास म्हात्रे साहबने बराबर प्रश्न पुछा है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे साहेब, आपने जो ठराव मांडा है उसमे थोडासा सजेशन ऐसा है की, सभी सदस्योंको लिजिए। सभी पक्षोको लिजिए। सभी पॉलिटीकल पार्टी का लिजिए।

**रमेश जैन :-**

उसके अलावा सभी पार्टी के लोग और सभी नगरसेवकोने उसको सहयोग किया। उस सभी के नाम लिजिए।

**हंसुकुमार पांडे :-**

ऐसा नही है।

**शशिकांत भोईर :-**

त्यास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

मै यह ठराव रखता हूँ।

**हंसुकुमार पांडे :-**

नही। ऐसा नही है।

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलत आहे .......

**मा. आयुक्त :-**

प्रशासनाला खुलासा करु द्या ना.

**हंसुकुमार पांडे :-**

पत्र वाचून खुलासा करा.

**रतन पाटील :-**

आजपर्यंत ब-याच वर्षापासून भाईंदर पूर्व आणि पश्चिम येथील चौपाटी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाले नाही. ब-याच वर्षापासून अन्य मा. खासदारांनी आपला निधी देउ केला. पण महानगरपालिकेकडे ती चौपाटीची जागा हस्तांतरीत झाली नाही म्हणून आपल्याला त्या जागेचा वापर करता आला नाही आणि ते आजपर्यंत भिजत घोंगड राहिले. आता सर्वपक्षीय सदस्यांनी ह्याचा पाठपुरवठा केलेला आहे. पण त्याच्यात जास्तीत जास्त श्रेय आहे भाजपाचे गटनेते, अध्यक्ष श्री. रोहिदास पाटील ह्यांनी त्यांचा पाठपुरावा जास्त केला आणि त्यांना श्रेय मिळाले . पण माझे म्हणणे असे आहे की, जर कोणाच्याही कोंबड्यामुळे सुर्य उगवत असेल तर चांगलेच आहे. आपला येथे् वाद नाही. ह्यांनी जास्त प्रयत्न केला म्हणून आपली ही चौपाटी हस्तांतरीत केली. सर्व पक्षांनी त्यासाठी सहकार्य आणि त्याचा पाठपुरावा केला आहे. सर्व पक्षांनी ती जागा महापालिकेकडे हस्तांतरीत करुन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नागरिकांसाठी एक भव्य चांगली सुशोभित चौपाटी व्हावी, असे सर्व प्रयत्न सर्व पक्षांनी केलेला आहे. त्यामध्ये कोणीही मागे नाही. भाजपा, शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस सर्व पक्षांनी त्यास पाठपुरावा केला आहे. जनता दल व अपक्ष जे असतील त्यांनीसुद्धा पाठपुरावा केलेला आहे. पण आता जे झालेले आहे की ती जागा महापालिकेकडे हस्तांतरीत झालेले आहे. महानगरपालिकेने त्या जागेचे चांगल्या पध्दतीने सुशोभित करावे. आपली टर्मसुध्दा आता संपत आलेली आहे. आपली टर्म संपताना आपण मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या जनतेला भव्यदिव्य अशी चौपाटी प्रदान करु या. अशा पध्दतीने आपण सगळ्यांनी एकदिलाने काम करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्यामध्ये तसे नाही.

**रतन पाटील :-**

तसे नाही तर मग तुम्ही सांगा. प्रशासनाने त्याचा खुलासा करावा.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, आपण आता ठराव करणार होतो की, चौपटी भाड्याने देणेबाबत. तर आता आपण चौपटी ही भाड्याने सुध्दा देउ शकत नाही. तसा ह्या पत्रावरुन उल्लेख होतो. आता आपण विषय घेतलेला आहे की, रु. ५००/-, १००/- भाडे तरी ते होउ शकत नाही. असे आपणांस निर्देश दिलेले आहेत.

**हंसूकुमार पांडे :-**

साहेब, ह्या पत्राच्या कॉपीची झेरॉक्स प्रत्येक सन्मा सदस्यांना द्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

कशाला आपण जागा ताब्यात घ्यायची. काय गरज आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे साहेब, जागा तर आपल्याला घ्यायची आहे. प्रश्न असा आहे की, आपण त्याठिकाणी खर्च किती करायचा. आपण खर्च करुन जर आपणांस त्यापासून उत्पन्न कमी मिळणार नसेल तर ......

**रतन पाटील :-**

तिकडे अख्या इथे तिवराची झाडे आहेत.

**मा. आयुक्त :-**

आपणांस पत्राची झेरॉक्स कॉपी पाहिजे आहे का? तर चर्चा झाल्यानंतर देतो.

**हंसूकुमार पांडे :-**

ठिक आहे. चालेल.

**जयंत पाटील :-**

साहेब, कसे असते. एखाद्या विभागामध्ये चौपटी असते. तिकडले नगरसेवक असे समजतात की, ही जागा आमची आहे. सर्वच किनारा काय हा समुद्रकिनारा म्हणून लाभत नाही. उदा. दरड, मध्यभाग आहे. त्यामध्ये प्रॉपर्टी ही सार्वजनिक असते. महापालिकेची असते. उत्तनचा समुद्रकिनारा हा तिकडचे नगरसेवक सांगणार नाहीत की, हा समुद्र किनारा आमचा आहे, महापालिकेचा आहे आणि सर्व नगरसेवक तो डेव्हलप करण्यासाठी प्रयत्न करीत असतात. निश्चित पत्र आणले असेल एखादा कुरीयरवाला पहिल्या नंबरने पास झाला म्हणून कुरीयरवाल्याचा आपण सत्कार करत नाही. त्यांनी पत्र आणले. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी फॉलो-अप केला असेल. कारण त्यांच्या प्रभागात ही चौपाटी येते म्हणून आमच्याच नावाचा बोर्ड तिथे लागणार किंवा लावणार असे न करता सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील हे जेष्ठ नगरसेवक आहेत. त्यांना सर्व काही त्याच्यातले कळते. महानगरपालिकेने प्रयत्न करुन आणि सर्व सन्मा. नगरसेवकांच्या सहकार्याने ही चौपाटी महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. त्याचा जनतेने फायदा घ्यावा. एवढेच लिहणे गरजेचे होते. असे माझे मत आहे. मा. आयुक्त साहेब याच्यावर काहीतरी खुलासा द्या.

**मा. आयुक्त :-**

महापालिकेच्यावतीने जेव्हा एखादा प्रस्ताव शासनाकडे आपण पाठवतो. तेव्हा तो महापालिकेचा प्रस्ताव असतो. महापालिकेच्या क्षेत्रातला प्रस्ताव असतो आणि एखादा प्रस्ताव मंजुर करण्यासाठी किंवा मार्गी

लावण्यासाठी सर्व सन्मा. नगरसेवक / सर्वपक्षीय त्याप्रमाणे प्रयत्न करत असतात मग त्याच्यामध्ये सरकाटमध्ये जो पक्ष सत्तवर असेज तर त्यापक्षांतील पदाधिकारी आपल्या महानगरपालिकेत कार्यरत असतील तेव्हा ते त्याच्यामध्ये जास्त पुढाकार घेतात. परंतु, हा जो प्रस्ताव असतो तो महानगरपालिकेचा प्रस्ताव असतो.

**जयंत पाटील :-**

एक रेषा असते ती रेषा मोठी आहे. ती रेषा तुम्ही कशी दाखवणार? तिकडे तुम्ही मोठी रेषा काढा. तुम्ही बोर्ड लावा म्हणजे ती रेषा छोटी होईल अशीच पध्दत आहे.

**हंसूकुमार पांडे :-**

नाही. बरोबर.

**जयंत पाटील :-**

तो बोर्ड सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी स्वतः लावलेला आहे. तो काढण्याची जबाबदारी जर अतिक्रमणमध्ये पैसे भरले असतील तर ते काढू शकणार नाहीत. त्यांनी त्यांची प्रसिध्दी कशी करावी हा त्यांचा तो वेगळा भाग आहे. महानगरपालिकेने सदर बोर्ड लावावा.

**हंसूकुमार पांडे :-**

महानगरपालिकेने बोर्ड लावावा.

**एस. ए. खान :-**

महानगरपालिकेने बोर्ड लगाना चाहिए।

**हंसूकुमार पांडे :-**

मा. कलेक्टर साहब से ऐसा ऐसा लॅन्ड हस्तांतर हुआ। एक लोग चौपटी डेव्हलप करके दे रहे है। ऐसा महानगरपालिकेने बोर्ड लगाना चाहिए।

**मा. सभापती :-**

अभी ऐसानही चलेगा की, मै स्टॅन्डीग सभापती हुॅ। मेरा बोर्ड लगेगा ऐसानही चलेगा क्या।

**हंसूकुमार पांडे :-**

चलेगा। क्यो नही चलेगा? मा. स्थायी समिती के सभी सदस्योंका नाम बोर्ड पर लिजीए। और बाकी ८७ जो नगरसेवक है उनका भी नाम डालिए।

**मा. आयुक्त साो. :-**

महापालिकेने मंजुरी दिल्याप्रमाणे आपल्या संपुर्ण शहारामध्ये जी काही विकास कामे चालु असतात. प्रत्येक प्रभागामध्ये विकास कामे चालु असतात. अशा विकास कामांचे बोर्ड जर आपण शहरांमध्ये फेरफटका मारला तर प्रत्येक जण आपले सन्मा. नगरसेवक आपल्या नावाचा बोर्ड तयार करुन नागरिकांची गैरसोय दुर केली. नागरिकांच्या या सोयी-सुविधा पुरविल्या असे बोर्ड लावतील. म्हणजे, हे शेवटी तुम्ही कामे करतातच ना. त्याबाबतीमध्ये अशा प्रकारची चर्चा कधी उपस्थित झाली नाही.

**हंसूकुमार पांडे :-**

साहेब, लेकिन आप ने मा. कलेक्टर साहब से यह चौपाटी का लॅन्ड माँगा था। वह मा. कलेक्टर साहब ने वह लॅन्ड आपको दिया है, महानगरपालिका को दिया है। तो महानगरपालिका का कर्तव्य बनता है की, वह पब्लिक को जानकारी दे की यह चौपाटी का पास हो गया है। वह आपका कर्तव्य है। महानगरपालिका का कर्तव्य है। वह आपने बोर्ड लगाना चाहिए और हम नगरसेवक बोर्ड क्यों लगाऐंगे। वह बोर्ड लगाना है तो बोर्डपर सब नगरसेवक के नाम डालकर बोर्ड लगाईए।

**मा. आयुक्त :-**

यह तो राजनितीका भाग है। इसमे प्रशासन क्या करेगी?

**हंसूकुमार पांडे :-**

प्रशासन ने बोर्ड लगाना चाहिए की मा. कलेक्टर साहब ने हम लोगो को चौपाटी दिया है। यह खुशखबरी ......खुशखबरी..... हम लोगो को चौपाटी दिया, ऐसा लिखीए ना। मा. कलेक्टर साहब ने हमे हॅन्डओव्हर दिया।

**मा. आयुक्त साो. :-**

मुझे यह लेटर कल मिला है।

**हंसूकुमार पांडे :-**

मै एक बात बोलता हुँ । की, यह लेटर आपको कल मिला था। आज बोर्ड लग गया ऐसा थोडी चलता है। आपके पास लेटर आने के पहिले बोर्ड लगता है। तो वह गलत बात है ।

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहब ने बोर्ड लगाया है।

**हंसूकुमार पांडे :-**

किसने भी लाया हो। आप बोल रहे थे ना की, कुरियर कोई भी ला सकता है। जिसका पहला नंबर आया है उनको इनाम मिलेगा की कुरीयरवालो को मिलेगा। यह बात अभी आपने ही बोली थी।

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब, तुम्ही काहीतरी निवेदन करा.

**रोहिदास पाटील :-**

तुमची समजुत पटली नसेल तर मी निवेदन करतो. वास्तविक मा. आयुक्त साहेबांनी जे सांगितले आहे ते सर्वांना माहित आहे. पण साधारणतः भाईदर पुर्वला चौपाटी व्हावी, असे माझे जे माझ्या रेकार्डला मिळते ते १९९० सालच्या पत्रात मिळते. मी सप्टेंबर १९९० साली पत्र दिले होते. भाईदर (प.) ला जाण्याऐवजी पूर्वेला गणपती विर्सजनाची सोय व्हावी, दशक्रियाविधीचे शेड व्हावे असा जो सगळा पत्रव्यवहार आहे. तो १९९० पासून माझी ऐवढी माठी फाईल झालेली आहे. चौपाटीच्या विकासासाठी, चौपाटीच्या हंस्तातरणासाठी महानगरपालिकेचे योगदान आहे. हे बरोबर आहे. ह्यात काहीच नाकारता येणार नाही. आमचे लाडके मा. खासदार, आधीचे खासदार, आताचे खासदार ह्यांचा यामध्ये प्रामाणिक प्रयत्न आहे. ह्याच्याबद्दल काही दुमत नाही. आणखी आमदार ह्याच्याशीही काही दुमत नाही. नगरसेवकांचाही प्रयत्न असेल, त्यातही काही दुमत नाही. अनेक संस्थाचा असेल त्याच्यातही काही दुमत नाही. ह्यामध्ये नगरपालिकेच्या अधिका-यांचे प्रयत्न तर आहेच. त्याच्याशिवाय कोणतेही कागद हलु शकत नाही. अगर कोणी एखादा नगरसेवक सांगेल आणि महानगरपालिकेने ते दिले तसे होत नाही. हे महानगरपालिका मागते तेव्हाच होते. महानगरपालिकेची ही अनेक पत्रे आहेत. माझे पत्र ३०-३५ असतील तर महानगरपालिकेची अर्धी पत्रे असतील. आणि आधीसुध्दा अशी हस्तांतर होत नाही. म्हणुन आम्हांला मा. आयुक्त साहेबांना समजवावे लागेल किंवा ती तशी हस्तांतर प्रक्रिया लवकर होत नाही. त्यासीठी देखभालीसाठी तरी घ्या. त्याठिकाणी काहीतरी केले तरी आपले ह्याच सभागृहातले सदस्य मा. आयुक्त साहेबांना कोंडित पकडण्यासाठी प्रयत्न करतात. ह्याची प्रचिती सगळ्यांना आहे. आणि ते जाहिर आहे. ते एखादा खोटा आरोप करण्यासारखा नाही. गेल्या आधिचे मा. आयुक्त आर.डी. शिंदे साहेब यांनी ३४ लाख रुपये खर्च बेकायदेशिर केला. असे ई. मराठीवर श्रीम. शानू भोईर ह्या नगरसेविकेने हे निवेदन केल्यानंतर त्याचा श्री. आर.डी. शिंदे साहेबांना अत्यंत त्रास झाला. तत्कालिन रेल्वे मंत्री मा. राम नाईक हे असल्या कारणाने, हे अत्यंत सोपे पडेल. साहेब, जेणेकरुन रेल्वेने सर्व पेपर सबमिट केले की, दरवर्षी ही चौपाटी गणपती विसर्जनाच्या वेळी आम्हांला पुलाचे काम १८-१८ दिवस बंद करावे लागते. हे त्यांचे रेकॉर्डिंग आहे. त्यांनी शासनाला रेकॉर्डिंग करुन लिहुन दिले की, १८-१८ दिवस काम बंद करावे लागते. ह्यावर्षी पुलाचे काम लवकर होणे गरजेचे आहे. ह्या नावाखाली महानगरपालिका, तिकडचे प्रतिनिधी आणि गॅमन इंडियाचे भारतीय इंजिनीअर ह्यांचे समन्वय बैठक होउन त्याच्यातुन निर्णय झाली की, ही पर्यायी जागा दुसरी करावी. जेणेकरुन वर्कशॉप बंद राहणार नाही. राष्ट्रीय काम बंद राहणार नाही. आणि त्यातुन तो गणेश घाट निर्माण झाला. साहेब, निवेदन दिल्यानंतर संपूर्ण डॉक्युमेंट मा. आयुक्त साहेब तुम्हांला हे माहीत नसेल म्हणुन मी सांगतो की, संपूर्ण डॉक्युमेंट चौपाटी शब्द काढुन गणेश घाट विकसीत करण्यासठी ते ३४ लाख रु. खर्च करण्यासाठी महापलिकेला खुलासा करावा लागेल. त्यावेळी सगळे अधिकारी टेंन्शनमध्ये होते. पण, त्यातुन सहिसलामत सुटले की, हे लोकांच्या, जनतेच्या सोयीचे आहे. त्यात जमेची बाजु एवढीच होती की, आज पहिल्या दिवसापासुन आरक्षणामध्ये जे चौपाटी आरक्षित होते. त्यामुळे मा. आयुक्त साहेबांना ते सोपे पडेल. की हे लोकांच्या सोयीचे केलेले आहे. तद्‌नंतर ज्या-ज्यावेळी काही प्रयत्न, काहीही केले की, अनेकांची वेगवेगळी निवेदने लागत होती. आमचा पाठपुरावा सारखा चालुच होता. आठ-दहा दिवसापूर्वी मा. आमदार श्री. मोतेसर साहेब, मा. आमदार श्री. संजय केळकर आणि आम्ही आमच्या पक्षाचे पदाधिकारी होते, सन्मा. नगरसेवक मदनसिंग होते तेव्हा आम्ही कलेक्टर साहेबांची भेट घेतली की, ह्या चौपाटीवर काहीही केले तरी महानगरपालिकेला ते अडचणीचे होते. म्हणून त्या ठिकाणी सफाई कामगार ठेवणे सिक्युरिटी ठेवणे अशा ज्या काही गोष्टी आहेत आणि तिथे जी देखभाल करणे, हे सोयीचे व्हावे म्हणून महानगरपालिकेनेही पत्र दिलेले आहे. तुम्ही हे देखभालीसाठी द्या. परवा मी जेव्हा गेलो तेव्हा सांगितले की तुम्ही उद्या या. आणि आम्ही काल गेलो तेव्हा आमच्या हातात एक टपाल मिळाले. त्यामुळे कुरियरचे काम करण्याची संधी मिळाली. साहेब, आता ह्या महापालिकेच्या कामकाजामध्ये कुरियरचे काम करण्याची जरी संधी मिळाली. मा. आयुक्त साहेब, तुम्हाला जरी संधी मिळाली तरी आम्ही तुम्हाला धन्यवाद देउ. आणि आमच्यापैकी नगरसेवकांनाही संधी मिळाली तरी आम्ही धन्यवाद देउ. कुरियरचे काम करण्याची संधी एखाद्याच्या वाटयाला मिळणार हे ही मोठे सौभाग्य असते. ते इतरांच्या वाटयाला का मिळाले नाही हे त्यांनी बघावे. की आपण कुरियरवाला का होउ शकत नाही. हे त्यांनी बघावे पण मी पुन्हा पुन्हा सांगतो आहे हे रेकॉर्डिंग व्हावे, की मला कुरिअरचे काम करायचे आहे. या महापालिकेत किंवा समाजात काही संधी मिळाली हे मी स्वतःला भाग्यवान समजणारा माणूस आहे. तो बोर्ड बाजीचा प्रश्न राहिला. स्वतःचे चेहरे आरशात दिसत नाही. दुस-याचेही दिसत नाही. काल ह्या ठिकाणी ती गर्भवती बाई मेली, असे सगळ्यांनी निवेदन केले होते की तेथे स्पीडब्रेकर टाकावे. ते स्पीडब्रेकर सन्मा. सदस्या हंसुकूमार पांडे साहेबांनी टाकले. हे बोर्ड लिहितेवेळी कोणाला लाज वाटली नाही. ह्या ठिकाणी मी आता पुन्हा सांगतो.

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब, स्पीडब्रेकरसाठी मी स्वतः भांडण केले होते.

**रोहिदास पाटील :-**

ऐकुन घ्या. माझे निवेदन झाल्याशिवाय कोणीही एक शब्द बोलायचे नाही. ह्यानंतर रेल्वेचा सबवे वर ब्रिज व्हावा. सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील साहेब, कधी कधी विसरतो. परत मागे-मागे वळुन बघतो. त्यांना कधी कधी त्याबद्दल आठवण होते. तो सबवे व्हावा. त्यात माझे संपूर्ण कॉरसपॉन्डन्स आहे. मा. सभापती साहेबांनी ते सोगितले नाही तर सरळ खोडुन टाकीन. सन्मा. सदस्य श्रश्री. ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी नंतर पत्र दिले. मला माहित आहे. मा. आयुक्त साहेबांना एक शब्द सांगतो की, सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी पत्र दिलेले आहे. मला आनंद आहे. सांगितलेकी माझ्या आणखीन मागच्या तारखेचे घ्या. असेही मी सांगितले. तारीख बघुन घ्या नाहीतर गफलत होईल. माझ्या आधीचेही घ्या. काही काम होते तर आम्हाला आनंद आहे. मी ठराव मांडते वेळी आजपर्यंत महापलिकेत बोललो नाही. ठराव कोणीही मांडा. कोणीही अनुमोदन द्या. पण काम पूर्ण होउ दे. अशी आमची भुमिका असते. जर सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी बोर्ड लावले तर मी कधीही बोलणार नाही. त्याच्या पलिकडचे सांगतो की, ज्यावेळी आपण रेल्वेत गेलो. मा. आयुक्त साहेब, मी ठणकाउन सांगतो की, मी जे काही करतो ते मी ठणकाउन सांगतो. मा. महापौर मॅडमच्या केबीनमध्ये जेव्हा रेल्वे अधिकारी आले होते तेव्हा मी आत गेलो होतो. मी त्याला निट ओळखत होतो. मी म्हटले की हे कोण आहेत, मी ह्याच्याशी मिटिंग करणार नाही. हे त्या डिपार्टमेंन्टचे अधिकारीच नाहीत. आपल्याला कधी जायचे असेल तर तुम्ही तुमच्या केबिनमध्ये आता डी.आर.एम. ला फोन लावा. मा. आयुक्त साहेब नव्हते. मा. महापौर मॅडमच्या केबिनमधुन फोन लावला. डी.आर.एम.जर दरवाजा उघडत नसेल तर, तुम्ही मा. महापौर म्हणुन चला. आम्ही पुढे राहतो, तुम्ही मागे राहा. आपण आतमध्ये दरवाजा खोलुन जाउ या. डी.आर.एम कसे नाही सांगतात ते आपण बघुन घ्या. पद्धतीने आपण गेलो. आपण सगळे गेलो होतो. की ते झाले, सन्मा. सदस्य हंसूकुमार पांडे साहेबांनी सबवे को थोपा, आम्ही बोललो का? साहेब, आम्ही बोललो नाही.हे रेकॉर्ड बनविण्यासाठी कोणालाही आनंद वाटत असेल आणि स्वतःला त्याबद्दल शहाणपण वाटत असेल तर त्यांनी सतत करत राहा. ही ह्या महापालिकेत जे काम करणार आहे ते करसस्पॉन्डसच्या आधारे घेऊन आणि नैतिकतेचा आधार घेऊन काम करणार आहे. बोर्ड लावले तर काय? आमची इतक्या वर्षाची तपश्चर्या आहे. कोण दगड मारणार आहे का? मा. आयुक्त साहेब आपली महापालिकेची जे.सी.पी. चालू असताना दगड मारणारे कोण आहे? आमचा रेकॉर्ड आहे. मिरारोड पोलिस स्टेशनला जा नावासहित तक्रार केली होती की, चौपाटी विकास कामामध्ये ह्या लोकांनी दगडफेक केलेली आहे. हे खोटे नाही. हे उगाच कशासाठी आहे? आम्ही सगळे मिळून काम केले. गेल्यावेळी ही कुठेतरी बोर्ड लिहला होता. मा. स्थायी समितीच्या सर्व लोकांनी ते केले. मी स्वतः दिलगीरी व्यक्त केली. कार्यकर्त्याचा उत्साहही होता. पण ह्यात जरासुध्दा चुक नाही. आमचे त्यामध्ये योगदान आहे आणि आम्ही ते केलेले आहे. मी तिकडचा स्थानिक नगरसवेक आहे आणि आता सगळ्यांना माहित आहे की, हा उपऱ्या इकडे कुठे तिकडे कुठे? पण अशा गोष्टीतून आपण उगाच कुठेतरी बोट ठेवतो. कोणाला तरी अपमानित करतो. ह्यात काही फायदा नाही. मी मा. स्थायी समितीमध्ये आल्या दिवसापासून मी मा. सभापती साहेबांना सांगितले. सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेबांना सांगितले की, जे आपले चांगले होईल ते करा. मी तुमच्याबरोबर आहे. मला ज्याठिकाणी विरोध करायचा आहे त्या ठिकाणी मी विरोध करणारच. आपल्याला ज्या ठिकाणी आपण चांगले करण्याचा प्रयत्न करु. आपल्याला कुठेतरी माहिती असायला पाहिजे की, आपण ती जागा कुठेतरी गहाण ठेवू शकतो. मा. कलेक्टर साहेब, गहाण ठेवू शकत नाही. कलेक्टर साहेब नगरसेवकाला जागा देतील का? आणि नगरसेवक महापालिकेला जागा देतील का? आपली अक्कल आपल्याकडेच आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्हाला जागा दिली नव्हती तर मग, तुम्ही बोर्ड का लावला?

**रोहिदास पाटील :-**

आमच्या प्रयत्नाने जागा हस्तांतरीत केली, असा तो बोर्ड आहे. तुम्ही बघून घ्या.

**हंसुकुमार पांडे :-**

ते तुमच्या प्रयत्नांनी केले आहे. तर मग, बाकीच्या नगरसेवकांनी काय केले? त्यांचे काहीच प्रयत्न नव्हते का? आणि पाठपुरावा करायचे काम महानगरपालिकेचे होते. मग, नगरपालिकेने ते का केले नाही?

**तुळशीदास म्हात्रे :-**

तो विषय सोडुन द्या. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, तुम्ही बोलले की, १९९० साली पत्रव्यवहार केला. १९९१ साली नगरपालिकेची निवडणुक झाली. मग, तुम्ही १ वर्षाअगोदर पत्रव्यवहार केला होता.

**रोहिदास पाटील :-**

१९८५ ला परिषद झाली मी तेव्हापासुन मंडळाध्यक्ष होतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

हे तुमचे वैयक्तिक बोलणे आहे, तुम्ही दोन्ही सदस्य विषयाला धरुन बोला.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, ह्यांना माझी विनंती आहे की, जर त्यांच्या प्रयत्नाने चौपाटी महापालिकेच्या ताब्यामध्ये आली असेल तर त्यांनी आणखी एक प्रयत्न केले पाहिजे की, जे अधिकार मा. कलेक्टर साहेबांनी आपल्याकडे ठेवलेले आहे. ते अधिकार महानगरपालिकेला द्या.

**रोहिदास पाटील :-**

ती चौपाटीची जागा महापालिकेच्या नावावर करेपर्यंत ती लढाई थांबवता येणार नाही.

**मा. सभापती :-**

पुढील विषय घ्या.

**जयंत पाटील :-**

मा. स्थायी समितीच्या सर्व सदस्यांनी मा. कलेक्टर साहेबांकडे जायचे. आणि आपल्याला जो आदेश परवानगी दिली आहे त्यात आपण सुधारणा करुन घ्या.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, आपण जरा खुलासा करा. की, सबवेच्या कामाचे काय झाले? त्याला ७ ते ८ महिने झाले. आपल्याला त्यांनी ऑक्टोबंर महिन्यात सांगितले होते की, ती तुम्हाला नवीन वर्षाला तोफा देतो. डी.आर.एम. ने आपल्याला सीटी इंजिनियर समोर सांगितले होते तर त्याचे काय झाले? सीटी इंजिनियर यांनी जरा खुलासा करा.

**मा.सभापती :-**

हम यह चर्चा करेंगे। पहले विषय होने दिजिए।

**हंसुकुमार पांडे :-**

मुझे इस बारेमें सब पता है। सीटी इंजिनियर साहेब आप जरासा खुलासा किजिऐ।

**मिंलिद वाणी :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, सबवेच्या संदर्भात आपल्याला डी.आर.एम. साहेबांनी कबुल केले होते की, आम्ही तुम्हाला नवीन वर्षात ह्याची परवानगी देउ तर डी.आर.एम. च्या ऑफिसने आपल्याला त्यानुसार जानेवारी महिन्याच्या शेवटी तशी परवानगी दिली आणि ते प्रकरण त्यांच्या हेड क्वार्टरला पाटवले होते. म्हणजे त्यांच्या हेड क्वार्टरला एक चिफ इंलिनिअर ब्रिगेड म्हणुन पोस्ट असते. त्यांच्याकडे ते पाठवले होते.त्यांच्यानंतर त्यांची टेक्निकल स्कुटनिंग केली. आपण त्यांना सबवेच्या कामात जे ड्राँईग दिले होते त्यात त्यांना काही सॉईल टेस्टिंगच्या संदर्भात आणि त्याच्या लांबीसंदर्भात काही प्रॉब्लेम्स वाटले म्हणुन मग,त्यांना ते क्लेरी करुन राईटस्ला पाठवले. मी तुम्हाला बोललोही होतो, मी तिथे जाउन सुध्दा आलो. त्यांनतर तुम्ही मला कळवर्टचेही सांगितले होते. त्या सबवबच्या कामात बाकी सगळे बरोबर होते फक्त त्यांचे म्हणणे असे आहे की, सबवे केल्यानंतर त्या खाली जी माती आहे. आणि म्हणुन त्यांनी त्यासाठी चिफ इंजिनिअरचे मत आहे. आणि म्हणुन त्यांनी त्यासाठी आणि त्यांची लांबी वाढवण्यासाठी ते खाली परत राईटस्च्या लोकांना परत साईड व्हिजिट करायला सांगितले आणि ते राईटस्चे लोक आज किंवा उद्या बघायला येणार आहेत. आणि त्यानंतर ते पुढचे निर्णय घेणार आहेत. मी कळवर्टच्या बाबतही गेलो होतो. कळवर्टसाठी रेल्वेला हा स्पीड रिस्ट्रीक्शन करायला लागणार आहे, ते मेगाब्लॉक वगैरे आहेत. असे काही प्रॉब्लेम येतात. तर मी त्या सिगनलींग ऑपरेशनचा जो मॅडमजेर आहे. श्री. जितुसिंग मॅनेजर म्हणुन आहेत. मी त्यांना भेटलो ते अजिबात ऐकत नव्हते. ते म्हणतात की इतके आमचे मेगाब्लॉक चालु आहेत. त्याच्यात आम्ही स्पीड रिस्ट्रीक्शन करु शकत नाही असे बरेच त्याच्याकडे मुद्दे होते ते स्पिडच्या संदर्भात होते की रेल्वेला हे काम चालु असतांना स्पीड ब्रेकर कमी करावे लागणार त्यामुळे त्यांचे सगळे शेड्युल डिस्टब होते आणि ह्या सबवेलाही प्रॉब्लेम होता पण ते डी.आर.एम. मध्ये आले म्हणुन आपल्याला लवकरच मंजुरी मिळाली पण कळवर्टच्या बाबतीत ऑपरेशन मॅनेजर असे असते. म्हणजे जे रेल्वेचे ट्रेव्हलिंग होते ते ते बघतात. तर ते अजिबात ऐकायला तयार नव्हते. मी, परवा गेलो होतो त्यांची भेट घेतली. त्यांना कनव्हिन्स करण्याचा प्रयत्न केला त्यांना सांगितले की, आम्हालां २६ जुलैला प्रॉब्लेम आला होता. तुमच्या ट्रॅकलाही प्रॉब्लेम येईल अशी आम्ही चर्चा केली होती त्यांनतर ते नाही असे बोलले होते. पण काल राईटसची माणसे त्याच्यांकडे गेले होते. तेव्हा त्यांना ते पॉझिटीव्ह बोलले होते. की तुमचे आलेले आहेत मी विचार करतो असे त्यांनी सांगितले.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, कलही मेरा श्री. एस.एन.सिंग साहब से बात हुआ है। आपके ब्रिगेस्ड के चिफ से बात हुआ है उन्होने कहा की मैंने आपके इंजिनियर को समझाया, इंजिनियर लोग वह काम नही कर सकते। क्लिअरकट शब्द मे बोला। डी.आर.एम. ने किस तरहो आपको आश्वासन दिया यह मेरे समझ मे नही आता है। मै बोलता हूॅ वह जगह सबवे नही बन सकता। क्योंकी वह जगह ६.५ मीटर बाद खोदना पडेगा। ६.५ का मतलब २० फूट और २० फूट अंदर जायेगा तो सबवे वहॉ कैसे बनेगा। इसका मतलब आप लोग गलत इन्फॉरमेशन देते है। एक की इन्फॉरमेशन सही नही है। ना तो पाठपुरावा करते है, अगर आप पाठपुरावा करते तो यह नौबत ही नही आती। और एक आदमी जाके वहॉ बोर्ड लगाते है की चौपाटी हस्तांतर करके लिया वह सब

महानगरपालिका कर्मचारीयोंका काम है। आप लोग करते क्या है। आपके कर्मचारी क्या काम करते है। अख्खा दिन चार-चार आदमी केबिन मे जाके बैठे रहते है। काम करनेवाले सिर्फ २० टका करते है। ८० टका काम करते नही आपके पास आदमी लोग शिल्लक रहते है। तो उनको पाठपुरावा करनेके लिऐ भेजिऐ। नगरसेवक वह पाठपुरावा करने के लिऐ क्यों जाते है।

**मिंलिद वाणी :-**

मै पहले ही बोल रहा था की, वह बिल्कुल तयार नही थे यह हम तो पाठपुरावा कर रहे है इसलिऐ अभी .........

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, पाठपुरावा होता नही है। आप भी एस.एन.सिंग साहब को अभी फोन लगाइऐ की नगरसेवक हंसुकुमार पांडे साहबने आपसे बात किया है या नही और आपने क्या जबाब दिया? यह पुछिऐ।

**मिंलिद वाणी :-**

मै पहले भी बोला था की उनका कहना है की, यहा पॉसिबल नही है।

**हंसुकुमार पांडे :-**

लोंगो को ऐसा लगता है की, वह हमारा काम नही है। वह महानगरपालिका का काम है। क्योंकी आप लोग इंजिनिअर है।

**मिंलिद वाणी :-**

मैंने पहले बोला था की, उनका टोटल विरोध था। वह बोल रहे है की, उधर सॉईल ऐसा है। मैने पहले ही यह बात कही थी की, उनका सॉईल टेंस्टीग करने के सिवा ऐसा हो नही सकता । उसका लॉबी भी चेंज करना पडेगा। तो मैने वही बोला है। जो पाठपुरावा हो रहा है। वहा इसके लिए ही हो रहा है।

**हंसुकुमार पांडे :-**

सर, सात - आठ महिना हो गया। आपने क्या पाठपुरावा किया है।

**मिंलिद वाणी :-**

उन्होंने आपको बोला है ना की वहाँ सबवे पॉसिबल नही है। तो फिर चर्चा करने का कोई मतलब नही है।

**हंसुकुमार पांडे :-**

क्या चर्चा करने का मतलब नही है? तो हम लोग इसके पीछे है तो वह गलत है क्या? श्री. मिंलिद वाणी साहेब आप जो जबाब दे रहे है वह गलत जबाब दे रहे है।

**मिंलिद वाणी :-**

आप क्लिअर कट बोल रहे है की, सबवे पॉसिबल नही है।

**हंसुकुमार पांडे :-**

मै बोला नही है। श्री. एस.एन.सिंग साहब ने बोला है।

**मिंलिद वाणी :-**

कमसे कम हमने पाठपुरावा करने बाद वह श्री. एस.एन.सिंग तक भी पाहुचा है।

**हंसुकुमार पांडे :-**

श्री. एस.एन.सिंग साहब के पास पोहुचने तक वही फाईल सडती रहेगी क्या? की उसके आगे भी कुछ होगा?

**एस.ए.खान :-**

इंजिनिअर को अगर काम नही करना है तो वह कुछ भी बोलते है ना।

**मिंलिद वाणी :-**

उन लोगो को हमने ...........

**हंसुकुमार पांडे :-**

ऐसा नही होता, एक चीज को फाईल करने के लिए सालो साल नही लगते है। पाठपुरावा करने के लिए अपने पास कर्मचारी कम है क्या? यह आप मुझे बताइए।

**मिंलिद वाणी:-**

पाठपुरावा बिलकुल चालु है।

**हंसुकुमार पांडे :-**

पाठपुरावा चालु नही है। चालु होता तो अब निर्णय आ चुका हो था।

**मिंलिद वाणी:-**

लेकिन उनका तो वह मन ही नही है। वह बोल रहे है की, वह हो नही सकता है। इसके लिए हम पाठपुरावा कर रहे है।

**हंसुकुमार पांडे :-**

अगर उनका मन ही नही है तो दुसरा सबवे निकालिए । आप जवाब बराबर दिजीए की वहा सबवे बन नही सकता है। साहब, आपको यह सब करना पडेगा।

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे आपको जवाब मिल गया है। पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ )

**मा. सभापती :-**

२ मिनिटासाठी सभा तहकुब करतो.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, कलव्हर्ट आणि सबवे हे दोन्ही महत्वाचे विषय आहे. हे तुम्हाला माहित आहे. म्हणुन ह्यांची चर्चा करणेचे गरजेचे आहे.

**मा. आयुक्त :-**

सभागृहामध्ये जर एखादा खात्रीचा विषय आला तर त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, हा नियम आहे. ते जे बोलत आहेत ह्यात कोणाचे वैयक्तिक बाब नाही. साहेब, कलव्हर्ट परिस्थिती ही अतिशय बिकट परिस्थिती आहे. मी त्यांना सांगितले की, तुम्ही नंतर बोला काही हरकत नाही एकदम टोकाची भुमीका कोणालाही घेउ नका.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घ्या.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३१ चे वाचन केले. )

**रोहिदास पाटील :-**

आमची मा. सभापती साहेबांना विनंती आहे की, ही आता १८/१/२००७ ची सभा आहे. त्यात आपण इतिवृत्तांतला मंजुरी देतो. आपण आज ५ व्या महिन्यातल्या सभेला बसलेली आहोत ह्यात काय काम झाले ह्याचे जवाब कोणतरी आम्हांला देईल का? आपली सभा चालु व्हायची असेल तर मी २ - ४ प्रश्न विचारेन ह्यात नाले - खोदाईचा विषय होता साहेब, लक्ष्मीबाग नाल्याचा आजही खोदकाम झालेले नाही. महापालिकेच्या सगळ्या क्षेत्रातल्या अतिमहत्वाचा कोणता रस्ता काढायला असेल तर तो वेस्टन हॉटेल च्या जवळच्या नालेसफाईचे आजही काम झाले नाही? साहेब, तुम्ही स्पष्ट निर्देश दिले होते की, हे काम ताबडतोब तातडीने करा. मी तुम्हाला विचारले होते की, हे काम नक्की कोण करणार ते सांगा म्हणजे मी त्यांचा पाठपुरावा करेन तुम्ही मा. उपायुक्त श्री. शेख साहेबांचे नाव सांगितले श्री. शेख साहेबांनी आजच्या घटकेलाही ते काम केले नाही.

**मा. आयुक्त :-**

त्या ठिकाणी वेस्टन हॉटेल जवळचा जो मोठा नाला आहे. तर काल त्या नाल्यावरती पोक लाईन टाकलेली आहे त्या ठिकाणी मी सक्षम पाहणी केली. आणि त्या ठिकाणी काम सुरु आहे. त्यानंतर आम्ही असेच पुढे वेस्टन हॉटेलकडे गेलो. वेस्टन हॉटेलवाल्याला सांगितले की, त्याच्या एन्ट्रीमध्ये जो फक्त एक वे तयार केलेला आहे तो दुसरा वे बंद आहे तर ही रस्ता चालु करायला सांगितला आणि त्यानंतर मागच्या दोन वर्षामध्ये त्यांच्या फ्लॉटमधुन आपण जो कच्चा नाला केला होता पाणी जाण्याचा जो मार्ग केलेला होता. काल ते ही मी त्यांना सांगितले ही कालचीच गोष्ट आहे. म्हणजे गेल्या २ दिवसापासुन मी कमीत कमी ४ - ४ तास शहरामध्ये फिरलो.

**जयंत पाटील :-**

मागच्या वेळी गटारावरती एक इमारती होती. ती इमारत महानगरपालिकेने तोडली गोल्डन नेस्ट कडुन जो रस्ता येतो. गोडदेव स्मशानाच्या बाजुला तेच गटर आहे. आपल्या त्याच गटारामध्ये एक कंपाउंड होते ते तुम्ही बघुन या.

**मा. आयुक्त :-**

आपल्या गटारामध्ये कंपाउड बांधले आहे?

**जयंत पाटील :-**

होय, त्यामुळे आपल्या गटाराला डिस्टर्ब होणार आहे. गोडदेव स्मशानाला लागुन आहे म्हणजे नंतर इमारत होउन तोडण्यापेक्षा आता काहीतरी करणे सोपे आहे.

**मा. आयुक्त :-**

तो नाला कुठे आहे? गोडदेव .........

**जयंत पाटील :-**

गोडदेव स्मशान जे आहे जो इंद्रलोक समोरचा रस्ता येतो त्या कॉनरवरच बरोबर आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, नाल्याबाबतीत स्पष्ट भुमिका घ्या स्पष्ट अधिकार द्या. मा. आयुक्त साहेबापर्यंत ते विचारायचे नाही. जे वहिवाटीचे नाले आहेत. त्यावर खरोखरच कोणी मातीचे भिंत टाकतोय कोण पत्रा लावत असेल तर तुम्ही ज्याकडे चार्ज दिला असेल त्यांनी ते सर्व तातडीनिशी काढावे असे तुम्ही निवेदन करा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य, रोहिदास पाटील साहेब, मी च तेच सांगतो, गेल्या दोन दिवसापासून ज्या ज्या ठिकाणी अडचणी आहेत. हे जेव्हा मला सॅनीटरी इन्स्पेक्टर जेव्हा सांगतात किंवा विभाग प्रमुख जेव्हा सांगतात तेव्हा त्या ठिकाणी मी गेल्या २ दिवसापासून व्हिजिट करतोय. आणि तिथे जाऊन मी समक्ष ज्याची जागा असेल त्याच्याशी बोलतो आणि त्यांना सांगतो की ह्याच्यातून आम्हाला असे करायचे आहे तर ते लगेच होकार देतात आणि ते आपल्याला अशाप्रकारे तरी कोणी अडचण केले नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण जर त्या फ्लॉटमध्ये नाल्यासाठी रस्ता खोदला तर मग तो कायमस्वरुपी राहील का? की फक्त टेम्परररी पावसाळ्यापुरती राहिल?

**मा. आयुक्त :-**

पावसाळ्यापुरतेच राहिल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नंतर आपण ते बंद करु शकतो ना.

**शशिकांत भोईर :-**

साहेब मध्यंतरी एक चर्चा झाली होती. त्यामध्ये आपले जे अगोदर नैसर्गिक नाले होते. तर त्या नैसर्गिक नाल्याचे जेव्हा प्लॅन मंजूरीला येतात किंवा कोणतातरी बिल्डर जेव्हा भरणी करतो तर तुम्ही त्या नैसर्गिक नाल्याचे रेखांकन तुमच्या डिफिसिटवर करा. त्यानंतर तुम्ही प्लॅन मंजूर करा. कारण ते नैसर्गिक नाला आहेत ना. त्यांची खोली बरोबर ते पाणी वाहून घेऊन जाऊ शकतात. कारण, त्याची तेवढी पातळी आहे. आपण जे गटार करतो ते उंचावर करतो. म्हणून त्या पातळीमुळे पाणी बरोबर जात नाही. तर तुम्ही आपले जे संबंधित अधिकारी असतील त्यांना निर्देश द्या की, त्या डिफिसिटवर नैसर्गिक नाल्याचे लवकरात लवकर रेखांकन करा आणि जेव्हा प्लॅन पास करणार त्यावेळेस तिथे नैसर्गिक नाला आहे तोच राहिल. तुम्हाला दुसऱ्या ठिकाणी बिल्डिंग शिफ्ट करावे लागेल. तर त्या त्या प्रवाहाने जास्त पाणी निघेल.

**एस. ए. खान :-**

इतिवृत्तांताच्या पान नं. ५ वर मारामाऱ्या लिहिलेले आहे. तेथे मारामारी केस ह्यामध्ये त्यांनी पैसे घेतलेले आहे. आणि हे पैसे कुठपर्यंत घेतले आहे ते येथे दिले नाही. ते पैसे घेत होते. तो मिरारोड स्टेशनच्या जवळपास गाडया उभ्या असतात. तेव्हा ते पैसे घ्यायचे....

**रोहिदास पाटील :-**

साहेब, ह्या ५ नं. वरच बसस्टॅण्डचा विषय आहे. बसस्टॅण्डवर तिथे गाडीवाला गाडी हटवत नाही, फेरिवालाही हटवत नाही तिकडे किती लोकांना त्रास होतो. साहेब, प्रत्येक मिटींगमध्ये तो विषय येतो. तिकडचे फेरीवाला हा गाडी हटवत नाही त्याचे कारण काय मला समजत नाही. साहेब आपण राजधानीच्या बिल्डिंगपासून रिक्षावाल्याला तिकडे उतरायला लागते. आणि साहेब, स्टेशनवरुन धावत यायला लावते. बंदरवाडी नाक्यावर आपले बसेस उभे राहतात, बेस्टच्या बसेस उभ्या राहतात तिथे फेरीवाले बसतात, खाजगी गाडया उभ्या राहतात. मी प्रत्येक वेळी मिटींगमध्ये विषय काढतो. प्रत्येक वेळी आपण सांगता की आपण विषय काढू या. पण, कोणीही हा विषय काढत नाही.

**मा. आयुक्त :-**

बंदरवाडी नाक्यावर ज्या बसेस उभ्या राहतात...

**रोहिदास पाटील :-**

साहेब तुम्ही तेवढा भाग मेन्टेन करा. सगळे भाईंदरचे भाग मेन्टेन होईल की होणार नाही पण राजधानी अपार्टमेंट पासून ते स्टेशनपर्यंत कोणीही फेरीवाला, कोणीही खाजगी गाडी उभी राहू नये आम्ही तुम्हाला एवढीच विनंती करतो.

**एस. ए. खान :-**

पान नं. ६ वर जे अमाऊंट आहे, ती अमाऊंट केली आहे का? की ते माफ करायचे आहे?

**मा. आयुक्त :-**

ते माफ केले आहे.

**नगरसचिव :-**

ते मंजूर झाले आहे.

**शशिकांत भोईर :-**

पान नं. ११ वर माझे संभाषण आहे, पहिलेच आहे. तेथे जलवाहिन्या टाकणे आणि रेती टाकणे असे लिहिले आहे. तर तिथे जलवाहिन्या टाकणे व स्ट्रीट लाईट लावणे असे लिहा.

**रोहिदास पाटील :-**

आपण सगळ्या पाण्याच्या टाकीवर टेलिफोन लावण्याचा ठराव टाकून दिला. श्री. खतगांवकर साहेब, तुम्ही आम्हाला सांगितले की, आठ दिवसांत टेलिफोन लागलेले असतील एम. टी. एन. एल. ची वायर लागली. पण, एकही टेलिफोन लागलेला नाही. श्री. पाटील साहेब पाण्याच्या टाकीवर कोठे टेलिफोन लागले आहे का? साहेब, आता वितरण व्यवस्था आहे. लोक त्रस्त आहेत. कमीत कमी त्यांना उत्तर जरी मिळाले की, इतक्या इतक्या वाजता पाणी सुटेल. तरी आपण त्यासाठी त्याला एकमताने ठराव दिला. मा. सभापती साहेब, तुम्ही त्यावेळी बोलले होते ते मला आठवत आहे. ज्या ज्या टाक्या आहेत त्या सर्व टाक्यावर टेलिफोन लावा असा एकमताने ठराव दिला. अजून एकही टेलिफोन लागला नाही.

**रतन पाटील :-**

ह्या गोष्टीला २ ते ३ महिने झाले. ह्या गोष्टीला ३ महिने झाले.

**रोहिदास पाटील :-**

त्या महिन्याचीच प्रोसिंडीग आहे.

**मा. आयुक्त :-**

टेलिफोनचे पैसे भरलेले आहेत.

**रतन पाटील :-**

साहेब तुम्ही १५ दिवसापूर्वी बोलला होतात की टेलिफोनचे पैसे भरले आहे. लगेच टेलिफोन लागतील. पण टेलिफोन का लागत नाही?

**गीता जैन :-**

साहेब टेलिफोनची व्यवस्था करा.

**रतन पाटील :-**

साहेब अधिका-यांचे मोबाईल बरोबर चालू असतात. पण, तिकडे पाण्याच्या टाकीवर टेलिफोन लावण्याचा ह्यांचा काही विचार नाही?

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेबांचे असे म्हणणे आहे की टेलिफोनचे पैसे भरले आहेत.

**मा. आयुक्त :-**

आठवडयाभरात टेलिफोन लागेल.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, ते आपल्याकडे खोदाईसाठी परमिशन घेतात. तर ते खोदाईची परमिशन अडवा. नाहीतर, आपले फोन कसे लागणार?

**रतन पाटील :-**

प्रायव्हेट टेलिफोन लावा ना.

**शशिकांत भोईर :-**

टाटा चे टेलिफोन, कॉडलेस लगेच मिळतात.

**रतन पाटील :-**

ते प्रायव्हेट टेलिफोन एक दिवसात लावून देतात.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, मा. आयुक्त साहेब ह्यामध्ये आपण मजूर सोसायटींना काम देतो. ह्यामध्ये प्रशांत हॉटेल ते बंदरवाडी नाक्यातील मजूर सोसायटींना ३ लाख रु. आपण मंजूर करुन दिले. त्यांनी काही कामच केले नाही. मग आपण पैसे दिले की दिले नाही?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब आपण त्याची अंमलबजावणी करुन त्याबाबत पाठपुरावा करुन चर्चा करु या.

(सन्मा. सदस्या गीता जैन ह्यांनी प्रकरण क. ३१ च्या ठरावाचे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ३१ :-**

दि. १८/०१/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. २९ :-**

दि. १८/०१/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. गिता जैन** **अनुमोदक :- श्री. रतन पाटील**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३२ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्या जेन्वी अल्मेडा ह्यांनी प्रकरण क्र. ३२ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे. पण त्याचबरोबर आपण मा. आयुक्त साहेबांशी सध्या जी चर्चा केली की सध्या जो जकातीचा बोजा आहे तो कुठल्याही आर्थिक महापालिकेवर त्याचा बोजा पडू नये, एवढी इच्छा आहे. आणि त्याच्याकडून त्या जकातधारकाकडून कोणत्याही पद्धतीने महापालिकेवर भुर्दंड पडणार नाही, ते मा. आयुक्त साहेबांनी विचार करावा.

**जयंत पाटील :-**

साहेब, मला थोडं बोलायचे आहे. आपण ते जकात दर सुची आताच परवा दिले आहे. त्याच्यामध्ये आपण माहिती तंत्रज्ञान ह्याची जकात माफी केलेली आहे. त्या संदर्भात येणारे सगळे इन्स्ट्रुमेंटस, यंत्रसामुग्री, शैक्षणिक पुस्तके, संदर्भग्रंथे ह्यावर आपण जकातमाफी केलेली आहे. स्काऊट-गाईड साहित्यवर जकात माफी केलेली आहे. अशा तऱ्हेची जकात माफी हा प्रकल्प आपला स्वतःचा आहे, महापालिकेचा आहे, तो काही वर्षानंतर आपल्या ताब्यात येणार आहे. तेव्हा त्याची जकात भरण्यासंबंधी जर महापालिका जकात भरणार असेल तर ते चुकीचे होईल. आपण त्या जकात धारकाबरोबर चर्चा करा आणि ह्याची आपण जकात माफी करुन घ्या.

**मा. आयुक्त :-**

ह्या संदर्भामध्ये मी सभागृहात सुचित करु इच्छितो की, आपण हे जे पुस्तिका तयार केलेली आहे. ह्या पुस्तिकेमध्ये एक ॲड करायला पाहिजे की महापालिकेचे जे जे प्रकल्प बीओटी पद्धतीने राबवू. त्या त्या प्रकल्पाला अशा प्रकारचे आपल्याला सवलत देता येईल आणि कसे देता येईल त्याबाबतीमध्ये खुलासा करणे, आवश्यक आहे आणि आपल्याला तशी तरतुद त्यामध्ये करुन घ्यावी लागेल.

**मा. सभापती :-**

त्यांचे म्हणणे आहे की, आपण त्यामध्ये तशी तरतुद करु.

**बालाजी खतगांवकर (मा.उपायुक्त (मु.) साो.) :-**

महापालिकेकडून खाजगी माध्यमातून किंवा बीओटी माध्यमातून जे प्रकल्प उभे राहतात. त्यास महापालिका काही खर्च करत नाही. मा. आयुक्त साहेबांनी या ठिकाणी नमूद केल्याप्रमाणे आपण ह्यावर्षीचा जो प्रस्ताव करतो आहे त्यामध्ये आपल्याला हे अट टाकता येईल. आणि त्याला कुठेही जकात अन्वये राहणार नाही. जे टेन्डर भरतील त्यांना कुठलेही जकात अन्वये राहणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

ही सभाच तसा आग्रह धरते.

**बालीजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ठिक आहे ना. आता जी सुचना आलेली आहे. आपल्याला त्याची अंमलबजावणी करता येईल. आता आपण टेंडर काढलेले आहे. त्या टेंडरमध्ये ज्या मसुदा सुचना आहे. त्यामध्ये ही अट टाकता येईल. साहेब, पण ही अट पूर्वीच्या ॲग्रीमेन्टमध्ये नव्हते.

**शशिकांत भोईर :-**

आपली जी २४ लाख रु. तरतुद आहे. आता जो जकात भरायला येईल त्याचा भरणा कोणी भरायचा? महापालिकेन भरायचा की .........

**बालीजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण जर ह्या ठेकेदाराला माप दिले तर त्याला आपल्याला द्यावे लागेल. जेस आपण मागे मेडीकलचा निर्णय घेतला होता. ते रद्द करण्याचा निर्णय घेतला होता आणि ह्याबाबतीत भिवंडीमध्ये आणि इतर महापालिकेत हे प्रोजेक्ट नव्याने आले. आणि त्यामध्ये जकातसाठी सुट द्यावी लागले. तर ते पैसे महापालिकेने भरले आहे.

**मा. आयुक्त :-**

बिओटीचा जो प्रोजेक्ट आहे. हा प्रोजेक्ट जो राबवतो आपण त्यांना जी काही मुदत दिली आहे. त्याच्यात त्या मुदतीनंतर तो संपूर्ण प्रोजेक्ट हा आपल्याच मालकीचा होणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, मग आपली ही तरतुद कमी राहिली की, नाही. जेव्हा बिओटी करतेवेळी, येतेवेळी त्याला येणारे जकातीचे हे आपण भरणार की ते भरणार? ही बाब क्लिअर व्हायला पाहिजे होते. साहेब, ही छोटी अमाउंट नाही. २४ लाख रु. ची अमाउंट आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पण, इतर महापालिकेत तसे आहे का?

**मा. आयुक्त :-**

इतर महापालिकेत असे आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

म्हणजे, महापालिकेचे स्वतःचे काम असेल तरी, आपण जकात भरायचे?

**जयंत पाटील :-**

साहेब, त्यावेळेस ........

**मा. आयुक्त :-**

ठेकेदारामार्फत जर समजा, त्याच्यात अटीशर्ती नसतील तर आपण काय करणार?

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही म्हणता की, दरसुची ..........

**मा. आयुक्त :-**

त्यांच्या दरसुचीमध्ये आपण नमुद करुया. आपण जे दरसुची क्लिअर करणार आहोत त्यामध्ये आपण महापालिकेच्या अंतर्गत ते बिओटी प्रोजेक्ट राबवले जाते. क्ष्यामध्ये जकातीची माफी द्यावी इव्हन त्यासाठी मा. स्थायी समितीचा आग्रह आहे. प्रशासनाचासुध्दा आग्रह आहे.

**गीता जैन :-**

साहेब, मग आपल्याला २५ आकडा करायला कुठे येणार?

**जयंत पाटील :-**

साहेब तुम्ही जे २४ रु. देणार आहात?

**गीता जैन :-**

तुम्ही आता कसले देणार आहात?

**जयंत पाटील :-**

हा प्रकल्प काही डबल होणार नाही. तुम्ही नंतर माप देणार, पुढच्या प्रकल्पाला माप देणार. पण, हा प्रकल्प एकदाच होणार आहे. आणि तो आपले २४ लाख रु घेउन मोकळा होईल.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, मी काय सांगितले की, विकास आराखड्यामध्ये जी जी आरक्षणे असतील आणि ह्यापुढे आपण बिओटी पध्दतीने जी काही कामे प्रस्तावित करणार आहोत किंवा कामे मंजुर करणार आहोत. त्यांसाठी आपण हा निर्णय त्यासुचीमध्ये नमुद करु.

**जयंत पाटील :-**

हे बरोबर आहे. पण, आताचे काय?

**गीता जैन :-**

आताचे काय झाले?

**मा. आयुक्त :-**

ह्यावर्षी आपण जो निर्णय घेतलेला आहे. तो ठेका झाल्यानंतरचा आपण बी.ओ.टी. चा निर्णय आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, आता तुम्ही चर्चा करु शकता ना. आपण त्यामध्ये जी तरतुद केली आहे. म्हणजे, आपण ह्यामध्ये जे ७३ कोटी रु. गृहीत धरले आहे. आमचे उत्पन्न जे गृहीत धरले आहे. बरोबर आहे. आता तो ह्यामध्ये करणार आहे. तेव्हा आपल्याकडे प्रोजेक्ट करणार आहे म्हणून, त्यामुळे तुमच्या मागच्या दरसुचीमध्ये आलेले नाही. पण, आता आपण प्रोजेक्ट तयार करतोय.

**मा. आयुक्त :-**

मी त्यांना सांगितलेले आहे. त्यामुळे त्याच्या कालावधीमध्येच आपली यंत्रसामुग्री येते. आपल्याला त्याच्याशी चर्चा करायला कुठलीच हरकत नाही. ऑक्ट्रॉयवाल्यांशी चर्चा करायला काहीच हरकत नाही. कारण ऑक्ट्रॉयवाल्याने आपल्याला पूर्वीच्या जो जकातीचा दर दिली. आपण मागणी केली, त्याने मागणी केली. त्यावेळेस त्याने ठेका भरला होता. त्यावेळेस त्याने हे गृहीत धरले नव्हते की, इकडे आपल्याला २४ लाख रु. मिळणार आहेत. त्यामध्ये ते गृहीतच नव्हते.

**मा. सभापती :-**

ती व्यक्ती २ वाजता येणार आहे.

**जयंत पाटील :-**

त्याबाबतीत चर्चा केली पाहिजे. आपण त्यांना महापालिकेचे उत्पन्न कशाला द्यायचे?

**तुळशीदास म्हात्रे :-**

त्यावेळी अधिका-यांनीसुध्दा ..........

**जयंत पाटील :-**

मला ३ लाख रु. मिळणार आहे, असे त्याने त्यावेळेस त्याने गृहीत धरले नव्हते. ते आपले पैसे आहेत. तो आपला प्रोजेक्ट आहे. ३० वर्षानंतर तो प्रोजेक्ट आपला होणार आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ही बाब कोणाच्या लक्षात नव्हती. मग, आपण आता ठेकेदाराला ही बाब लक्षात का आणून देतो.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर करा ते कामाची अंमलबजावणी करतील ना. ती व्यक्ती २ वाजता येत आहे.

**गीता जैन :-**

मा. सभापती साहेब, ठराव मंजुर झाला म्हणजे आपण २५ दिले.

**मा. सभापती :-**

दिले नाही.

**मा. आयुक्त :-**

ह्या संदर्भामध्ये मी पुन्हा खुलासा करतो की, ह्यापूर्वी आपण जो औषधावरती निर्णय घेतला होता. औषध खरेदीवरती निर्णय घेतला होता. आपण औषध खरेदीचा निर्णय घेतल्यानंतर आपण सगळ्यांनी त्याला मान्यता दिली होती की, औषधावरती जकात घेउ नये म्हणून. परंतु, औषधावरती होणारी जकात, जो कोणी जकातीचा कॉन्ट्रॅक्टर होता. आपण त्याला तर परत दिले. मा. उपायुक्त साहेब आपण ही बाब जरा क्लिअर करा.

**रतन पाटील :-**

महानगरपालिकेला एक पैशाचासुध्दा भुर्दंड नाही असे हे ही मी बोललो. ह्याचे व्यवस्थापन व्हावे. साहेब, मा. आयुक्त साहेबांशी आतमध्ये जी चर्चा केली. त्यामध्ये आपण बोललात की, हे सर्वांचेच मत आहे की, महापालिकेला एक पैशाचासुध्दा भुर्दंड होउ नये. आपण त्या जकात धारकाबरोबर बसून महापालिकेचे पैसे कसे वाचतील, कशा पध्दतीने आपण बोलणार आहोत, तर आपण पहिले ते बोलून घ्या. आम्ही आधी बोलतो. आम्ही ठरावासाठी बसलो आहोत. समजा, ठराव झाला, आम्ही अनुमोदन दिले तर तो प्रश्न नाही. पण, अनुमोदन झाले तरी अजून सही बाकी आहे. पण महापालिकेचा एक पैसासुध्दा जर भुर्दंड होत असेल तर आम्ही तो ठराव रद्द करु. महापालिकेचा एक पैसासुध्दा जाता कामा नये. कारण, महापालिकेचे आर्थिक दृष्टीकोनातून लक्ष ठेवणे, हे प्रत्येक नगरसेवकाचे काम आहे. कुठलाही भुर्दंड होउ नये. आज आम्ही आतुरतेने का बोलत आहोत. तर, कुठलाही पैसा खर्च होउ नये. आपण त्या जकातधारकाला बोलावून घ्या. आपण त्याच्याकडे विनंती करु. पाहिजे तर आपण सर्व मा. स्थायी समितीचे सदस्य त्याच्याकडे विनंती करतील की, हा प्रकल्प महापालिकेचा होत आहे. ही महापालिकेची उद्या प्रॉपर्टी होणार आहे. म्हणून ह्यासाठी आम्हाला जकात माफ करावी. करावीच.

**मा. सभापती :–**

आपण हा विषय पेंडिंग ठेवू या. तो जकातधारक आल्यानंतर आपण चर्चा करू.

**मा. आयुक्त :–**

ती व्यक्ती २ वाजेपर्यंत येणार आहे. तो पर्यंत आपली चर्चा होईलच ना.

**रोहिदास पाटील :–**

मा. सभापती साहेबांना विनंती करतो. आपले शासकीय कामकाज आहे. तुम्ही जनता दरबार भरवता. लोकांची सेवा होते असे त्यातून... माझी विनंती अशी आहे की, ज्यांनी पैसे भरलेले जे बोर्ड लागलेले आहेत. तुम्ही महाविद्यालयाचे दोन महिन्याचे पैसे घेतले आणि त्याचें बोर्ड लावले आहे. त्याच्यावरच महापालिकेच्या जनता दरबारचा बोर्ड लागतो. साहेब हे असे कसे आहे? थोडे सांभाळले पाहिजे. आम्ही कोणाची तक्रार कोणाकडे करायची? मी त्याची दखल घ्यायला सांगत आहे.

**मा. सभापती :–**

या बाबतीत मी दखल घेतो.

(नगरसचिवांनी प्रकरण क्रं. ३३ चे वाचन केले )

(सन्मा. सदस्य श्री. परशुराम म्हात्रे यांनी प्रकरण क्रं. ३३ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस.एस. खान :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव मंजुर करण्यात येत आहे. पाणीपुरवठयाचा लोकांना बोलवा. प्रकरण क्रं.३३ हा विषय मंजुर झाला. श्री. पाणपट्टे साहेब, ह्यांची अंमलबजावणी लगेच झाले पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, इतिवृत्तांची वाट न पाहता त्वरीत अंमलबाजवणी करा.

**मा. आयुक्त :-**

ठराव कायम करून दया.

**मा. सभापती :-**

सदर ठराव कायम करण्यात येत आहे.

**प्रकारण क्रं. ३३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण कामास एक वर्षाची मुदतवाढ मिळणेबाबत.

**ठराव क्रं. ३१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. सदरचे काम मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी अंबरनाथ पूर्व यांना प्रति श्वान रूपये ९५०/– प्रमाणे निविदा मागवून देण्यात आलेले होते सदर कामाची मुदत ह्या महिन्यात संपत आहे.

चालू आर्थिक वर्षात श्वान प्रजोत्पादनावर संपूर्ण नियंत्रण आणण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे हे उद्दीष्ट पूर्तीसाठी उर्वरीत श्वानांवर नसबंदी शस्त्रक्रिया होणे आवश्यक आहे व तसेच उर्वरित श्वानांची नसबंदी व लसीकरण मागील मंजूर दराने करण्याबाबतचे संस्थेने पत्र दिले आहे.

इतर महानगरपालिका क्षेत्रातील कामाचे दर पाहता सदर संस्थेचा दर योग्य व वाजवी असून महानगरपालिकेसाठी हितावह आहे.

तसेच श्वान नसबंदी व लसीकरणाचे कामासाठी सदर संस्थेने उत्तन शिरे गावठण येथील श्वान निर्बिजीकरण केंद्रास आंतरराष्ट्रीय मानांकन (ISO 9001:2000) प्राप्त करून दिले आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता व संस्थेची कार्यक्षमता पाहता मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी अंबरनाथ पूर्व या संस्थेस उर्वरीत मोकाट कुत्र्यांची नसबंदी व लसीकरणाच्या कामासाठी एक वर्षाच्या मुदत वाढीस मा. स्थायी समिती मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. परशुराम म्हात्रे** **अनुमोदक :- ॲड. एस.ए.खान.**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, कुत्र्यांचे र्निबिजीकरण केल्यानंतर, ऑपरेशन केल्यानंतर परत पिल्ले कशी होतात?

**मा. आयुक्त :-**

ऑपरेशन केल्यानंतरच परत पिल्ले होत नाही.

**जयंत पाटील :-**

शहरामध्ये अनेक लहान पिल्ले आहबेत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही इतकी घाई करता की, तुम्ही आमचे मत सुध्दा ऐकायला तयार नाही. जे चांगले काम असेल त्याला आपण होय म्हणू या. पण, त्यात काही त्रुटी असतील तर ते तुम्ही लक्षात घेणार की नाही? मा. आयुक्त साहेब, तुम्ही घाई करू नका. आधि आमचे ऐका. मग, तुम्ही निवेदन करा.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, हे खरे आहे की, आपण शहरातील कुत्र्यांना, कुत्रींना नसबंदी केली आहे, असा ह्यांचा दावा आहे. ह्या शहरातील कुत्र्यांच्या प्रजननांचीजी काही संख्या आहे, त्यामध्ये कमी संख्या आलेली आहे, असा ह्यांचा दावा आहे. आम्हांला जे दिसते तेही खरे आहे की, अजून त्या कुत्र्यांची संख्या वाढत आहे. त्याचबरोबर, जशी ती संख्या वाढत आहे. त्याचबरोबर, पिसाळलेल्या कुत्र्यांचीही संख्या वाढत आहे. त्याचबरोबर, जशी ती संख्या वाढत आहे. कुत्रे एकमेकांना चावतात. आणि चावल्यावेळी त्या ज्या जखमा होतात. त्याची नीट जी सेवा व्हायला पाहिजे, तेव्हा त्या कुत्र्यांना ताबडतोब उचलून नेले पाहिजे. ती ट्रीटमेंट नीट होत नाही. आणि कुत्रे चावायचे प्रमाण वाढले आहे. लोकांना कुत्रे चावायचे प्रमाण वाढले आहे. लोकांना कुत्रे चावतात. त्यावेळी आपले

जे इंजेक्शन दयायचे आहे. ते आरोग्य खाते आाणि ह्यांचे कुठेतरी काहीतरी डेव्हेलप व्हायला पाहिजे. ह्या विषयी मंध्यतरी आपल्या मा. स्थायी समितीमध्ये सुध्दा झाले होते की, एक ही इंजेक्शन नव्हते. आता मी ही सांगतो की, ५-६ दिवसापूर्वी मी फोन केला, कुत्रा चावला होता. साहेब, चारही ठिकाणी इंजेक्शन मिळाले नाही. ह्याचे कुठेतरी ताळमेळ व्हायला पाहिजे. ना.मी आरोग्य अधिका-यांनाच फोन केला होता. माझा ७ वा दिवस आहे. बंदरवाडीत नव्हते, नवघरमध्ये नव्हते, कुठेही नव्हते. साहेब, मग नंतर पेणकर पाड्यावर आणले. मी सांगतो की, ३ तास गेल्यानंतर ते पेणकर पाड्यावरून ते एक इंजेक्शन आणले. आपण सगळे ठराव मंजुर करून देतो. मग, एक्झ्यूकेशन बरोबर होत नसेल आणि ह्यात अत्यावश्यक सेवा नाही. त्याची जर पुर्तता होत नसेल, तर साहेब, त्याला कोण जबाबदार आहे?

**मा. आयुक्त :—**

आपल्याकडे इंजेक्शन आणि औषधांचा उपलब्ध साठा आहे.

**जेन्वी आल्मेडा :—**

मी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, ह्यांना कोणत्या दिवशी हे झाले ते विचारले १२ तारखेला रात्री एक घटना घडली होती त्या आधी ४ केसेस झाल्या होता. तेव्हा नव्हते. मी माझ्यापरिने प्रायव्हेटली घेतले.

**रोहिदास पाटील :—**

घेतले आहे ना. म्हणजे हे नव्हतचे हे खरे आहे ना.

**जेन्वी आल्मेडा :—**

म्हणजे, १२ तारखेच्या आधी नव्हते. नंतर मी १३ तारखेला सकाळी फोन केला तर श्री. शिंदे साहेब होते. त्या दिवशी रविवार होता. तरीसुध्दा श्री. शिंदे साहेबांनी सांगितले की, मॅडम, आज रविवार आहे. इंजेकशन्स अव्हेलेबल आहेत. उद्या सकाळी मी पाठवतो.

**रोहिदास पाटील :—**

आज किती तारीख आहे?

**जेन्वी आल्मेडा :—**

आज तारीख १८ आहे.

**रोहिदास पाटील :—**

१८ वजा ७ करा.

**जेन्वी आल्मेडा :—**

मी तुम्हाला तारीख सांगत आहे. ते तुम्ही वजा करा.

**रोहिदास पाटील :—**

साहेब, जेव्हा नव्हते तेव्हा ते असायला पाहिजे. म्हणजे आम्ही जे सांगतो तेव्हा असेल तेव्हाच सांगतो ना. नाहितर उगाच मिटिंगला चर्चा करा., असे नाही. पण त्या दोघांचे चालला पाहिजे. हे जसे नसबंदी करत जातील तसे ते पिसाळत जातील. ते पिसाळतील तसे ते चावायला लागतील.

**मा. सभापती :—**

पाणी पुरवठ्याचे अधिकारी आले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :—**

श्री. बारंकुड साहेब, पाणी पुरवठ्याचे अधिकारी आहे आहेत ना, त्यांची ओळख करून द्या.

**मा. सभापती :—**

आपण ओळख करू या.

**तुळशीदास म्हात्रे :—**

मी काय म्हणतो की, तुम्ही कुत्र्यांचे ऑपरेशन केल्यानंतर चवळतात आणि ते लोकांना चावतात. त्यांचे काय

**मा. सभापती :—**

आपण ह्याविषयी नंतर चर्चा करू या. पाणी पुरवठी विभागाचे अधिकारी आले आहेत. त्याच्यांशी पहिले चर्चा करू या.

**मा. आयुक्त :—**

मा. स्थायी समितीमध्ये ब-याच वेळा आपली चर्चा झालेली आहे. आणि आपली चर्चा नेहमी होते की, पाणी पुरवठ्याच्या संदर्भात जे एम.जी.पी. चे जे अधिकारी आहेत. त्यांना बोलावावे. त्याप्रमाणे आपण साधारण महिन्यातून एकदा त्यांना ह्या ठिकाणी निमंत्रित करणार आहोत. आणि आपणे पाणीपुरवठ्याचे जे काही पेंडिंग काम आहे. त्यांच्याकडून आपल्याला त्या कामाच्या प्रगतीचा अहवाल प्राप्त करून घ्यायचा आहे. त्यासाठी आज ह्या ठिकाणी एम.जी.पी. चे अधिकारी आलेले आहेत. तर, आपल्याला त्यांना काय विचारायचे असेल तर ते

आपण विचारून जी काही कामाची प्रगती आहे, त्यामझ्ये येणाऱ्या अडचणी किंवा त्यांच्या कामाची जी काही प्रगती असेल, ह्या संदर्भामध्ये आपण चर्चा करू या.

**राजन धादवड ( प्रभारी कार्यकारी अभियंता) :—**

मी राजन धादवड प्रभारी कार्यकारी अभियंता सध्या ह्याचे हेड इनचार्ज माझ्याकडे आहे. सध्या साहेब २८ तारखेपर्यंत रजेवरती आहे.

**रोहिदास पाटील :—**

पहिले आपल्या चिफ इंजिनियर ह्यांना निवेदन करू. या.्णि ते कोणत्या पध्दतीने निवेदन करतील, तेही समजु दया. मग, आपण कसे निवेदन करायचे तेही ठरवता येईल.

**शिवाजी बारकुंड :—**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने, मागील मा. स्थायी समितीमध्ये साहेबांनी सांगितल्यानुसार सो. ५० एम.एल.डी. मध्ये अर्धवट राहिलेल्या कामाबद्दल  जी.पी. च्या लोकांबरोबर पत्रव्यवहार चालू होता. त्यासंबंधित अधिकाऱ्याबरोबर बैठक घेण्याचे आयोजित केले होते. त्यानुसार आज मा. स्थायी समिती मध्ये सर्वांना बोलवले आहे. आज थोडक्यात एख पार्श्वभूमीा सांगती की, सो. एम.एल.डी, मध्ये अर्धवट राहिलेली कामे होती. ती कामे एम.एम.आर.डी.अे नी फंड न दिल्यामुळे हे संपूर्ण  इम्पिमेन्टेशन एम.जी.पी करत होते. ते बसल्यामुळे कामे बंद पडली होती. दरम्यान  ही बाब मा. आयुक्त साहेब नंतर मा. महासभेपुढे ठेवली. मा. महासभेने ठराव केला की, एम.एम.आर.डी.ए. चे निधी न घेता महापालिकेने निधी घ्यावा. आणि उरलेली कामे पुर्ण करावीत. त्यानुसार एन.जी.पी. बरोबर पत्रव्यवहार केला गेला. एम.जी.पी. चे चिफ इंजिनिअर आणि सर्व अधिकारी, मा. आयुक्त साहेब ह्यांच्याबरोबर बैठका  झाल्या. त्यांनी आधी कॉन्ट्रॅक्टरला हे सांगितले, की महापालिका पैसे देणार आहे. काम चालु करा, त्यानुसार हे सगळे होऊन कामे चालु झालेली आहेत. पण म्हणावा तसा, कामांना वेग नाही. आणि ह्या संदर्भात सगळी चर्चा करण्यासाठी बोलवलेले आहे. तर, त्याबाबतीत कार्यकारी अभियंता आपल्याला थोडीशी माहिती देतील.

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

आपली एकुण योजना ११० कोटी रु. ची होती. त्यापैकी आतापर्यंत आपल्याला ९४.४३ कोटी रु. प्राप्त निधी झालेले आहे. आतापर्यंत मार्च २००७ पर्यंत योजनेवरती  ९९.७६ कोटी रु. म्हणजे जवळजवळ आपण ५ कोटी रु. खर्च जास्त केलेला आहे. आणि सध्या जे काम चालु आहे. ते पुर्ण करण्याकरीता जवळजवळ आपल्याला आठ एक कोटी रु. ची अजुन आवश्यकता आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुमचे ट्रान्सलेशन झाले तर तसे आम्हाला सांगा.

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

आपली एकुण मंजुर किंमत आहे. ११०.६४ कोटी रु. आहे. आपल्याला आतापर्यंत म्हणजे, शासकीय अनुदान आणि एम. एम. आर.डी.ए. चे कर्ज मिळुन ९४.४३ कोटी रु. निधी आपल्याला प्राप्त झाले आहे. आणि योजनेवरती ३ मार्च २००७ पर्यंत ९९.७६ कोटी रु. खर्च झालेला आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, आता जी सुरु असलेली कामे आहेत. त्याच्यावर किती खर्च होणार आहे?

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

आपल्याला संपुर्ण योजनेचे काम करण्यासाठी ८ कोटी रु. चा निधी लागणार आहे. त्यामध्ये आपले कामे चालु असणारे सिल्वर पार्कमध्ये....

**रतन पाटील :-**

ज्या कामावर ८ कोटी रु. खर्च होणार आहे. त्यात काही अर्धवट कामे झाली आहेत का?

**मा. आयुक्त :-**

त्यांना पहिले पुर्ण सांगु द्या. नंतर मग, आपण त्यावर चर्चा करु या.

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

साहेब, आपले सिल्वर पार्क, कनकिया पार्क, सुदामानगर येथे स्मंप आणि पंप बसविण्याचे काम चालु आहे. नवघर येथे स्मंप व पंपाचे काम चालु करायचे आहे. राई मुर्धा येथे..

**रतन पाटील :-**

कनकिया, सिल्वर पार्क कामाबद्दल बोला.

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

सिल्वर पार्कचे काम चालु आहे. नंतर कनकिया पार्क फायलिंगचे काम चालु आहे. सुदामानगरचे कामसुद्धा चालु आहे. नवघर येथल्या टाकीचे काम चालु करायचे आहे.

**रतन पाटील :-**

सुदामानगरचे काम चालु करायचे आहे?

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

काम चालु आहे.

**रतन पाटील :-**

चालु आहे?

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

होय. आपल्या राई-मुर्धा येथील फायलिंगचे काम चालु आहे. इ.एस.आर १० लीटरचा आहे. त्यचे फायलिंगचे काम चालु आहे. कमला पार्कचे जवळजवळ काल रात्री काम झालेले आहे. सर्व्हे नं. ७७७ मध्ये काम चालु आहे. उत्तन येथे इ.एस.आर.चे पाईप लाईन चे काम चालु आहे. आणि गोडदेव येथील स्मंपचे काम चालु केले नाही.

**जयंत पाटील :-**

गोडदेव येथे फायलिंग केले आहे?

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

होय. पण तिथे जागेचा प्रॉब्लेम असल्यामुळे ते काम बंद आहे.

**रतन पाटील :-**

पण आतापर्यंत हा प्रश्न....

**शशिकांत भोईर :-**

आपले स्पष्टीकरण सांगु झाले असेल तर सांगा. मग, मी तुम्हाला जागेचा प्रॉब्लेम कुठे आहे, ते सांगतो.

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

मी. ए.एस.आर. चे राहिलेली कामे सांगितली.

**शिवाजी बारकुंड :-**

राहिलेली कामे आणि त्यासाठी लागणारा निधी. त्याबाबत आपण मा. महासभेमध्ये ठराव करुन दिलेला आहे की, त्यांना निधी देण्याचे असा ठराव करुन दिलेला आहे. त्याप्रमाणे आपण ४० लाख रु. पहिल्यांदा पेड केले आहे. आता ३ कोटी रु. चे सगळी नोट मंजुरी झाली आहे. एकुण ३ कोटी रु. चा चेकसुद्धा त्यांना जाईल त्यांना ३ कोटी रु. चा डिमांड आहे. ३ कोटी ४० लाख रु. त्यांना जवळजवळ वर्ग होतील. आणि त्यांची अजुनही उरलेली कामे तशी पुर्ण होतील. त्याप्रमाणे आपण त्यांना एम.एम.आर.डी.ए. चे लोन न घेता पेमेन्ट करणार आहोत. एम.एम.आर.डी.ए. चे जे ११ टक्के नी लोन होते. त्याऐवजी महापालिका निधीतुन महापालिका खर्च करणार. निधीमुळे जवळजवळ दीड वर्षे -दोन वर्षे कामे बंद पडली होती. एम.एम.आर.डी.ए. ने लोनच दिले नव्हते आणि आता ज्या शंका असतील त्या एकेक सन्मा. सदस्यांनी विचारा.

**रतन पाटील :-**

भाईंदर (पश्चिम) येथील कमला पार्कचे जे काम आहे. तेथील सम्पचे काम अर्धवट आहे. त्यांची पुर्ण स्थिती कधी होईल? आपण ह्याचे प्रत्येकाचे कॅलक्युलेशन काढले आहे का? आणि साहेब नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान ह्या दोन्ही बाबत सांगा. त्या कामाचे किती खर्च राहिला आहे?त्याचा अजुन किती खर्च होईल?

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

अजुन जवळजवळ त्याला ५० लाख रु. खर्च होईल. म्हणजे, दोन्ही मिळुन आहे म्हणजे कमला पार्क आणि सर्व्हे नं. ७७७ दोन्ही मिळुन अजुन आपल्याला ५० लाख रु. खर्च बाकी आहे.

**रतन पाटील :-**

त्याचबरोबर, नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथे आणि आपले जे स्टेडियम आहे. त्या स्टेडियमच्या बाजुला अर्धवट काम झाले आहे. दोन्ही काम अर्धवट आहे. जवळजवळ ते काम पुर्ण होण्यासाठी थोडेच काम बाकी आहे.

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

आपले स्मपचे काम ७० टक्के झाले आहे. आणि इ.एस.आर. चे फायलिंग केले आहे. बाकीचे काम निधी नाही म्हणुन बंद आहे.

**रोहिदास पाटील :-**

निधी नाही म्हणजे, आम्ही पैसे दिले नाही म्हणुन बंद आहे का? एम.एम.आर.डी.ए. दिले नाही म्हणुन बंद आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, जी अर्धवट राहिलेली कामे आहेत त्यांनी जनरल सांगितले आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, जी लहान कामे आहेत आणि त्यासाठी जो थोडा खर्च होणार आहे. ती कामे पटकन आटोपता आली पाहिजे. बाकीचे जे फाऊंडेशन पासुन करायचे आहे. त्यासाठी अवधी लागणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे काम निधीअभावी थांबले आहे. कोणी निधी देणार बाकी आहे. आमची महानगरपालिकेकडुन येणे बाकी आहे की, तुम्हाला कोणा कोणाकडुन निधी येणे बाकी आहे?

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

आपल्याला २००२ पर्यंत एम.एम.आर.डी.ए. कडुन फंड मिळत होता. त्यानंतर आपली स्किम चालु झाली, असे समजुन एम.एम.आर.डी.ए. ने आपले फंड बंद केले. त्यानंतर आम्ही पाठपुरावा केला. नंतर महापालिकेने ठराव करुन सांगितला की. जे उर्वरित फंड आहे जो एम.एम. आर.डी.ए. ने बंद केलेला आहे. ते महानगरपालिका देणार आहे. त्यानुसार आम्ही ३ कोटी रु. ची मागणी केली होती. त्यावरुन ४० लाख रु. अगोदर दिले होते आणि आता ३ कोटी रु. देणार आहे. पण एम.एम.आर.डी.ए. चे जे लोन कंपाऊनंट होतात. ते बंद झाले आहे आणि जी आहे. ते गर्व्हनमेंट आहे पण ते लोन कंपाऊनंट चे जे पैसे आहेत. ते आता एम.एम.आर.डी.ए. ने न देता महापालिका देणार आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपल्याला माहित असेल की, आपला जेव्हा करारनामा केला होता. त्यावेळेस एम.एम.आर.डी.ए. ने तुम्हाला सरळ सांगितले होते की, जसे तुम्ही काम करणार तसे तुम्ही प्रोग्रेसिव्ह रिपोर्ट द्या आणि आपली बिले द्या. ते आपल्याला लोन लगेच देणार आणि आपण बोलता की, पाण्याची स्किम सुरु झाले, पाणी सुरु झाले, त्यानंतर आपले कर्तव्य नव्हते का? की, आमची कामे एवढी बाकी आहेत तर आपल्या विभागाकडून त्याची पुर्तता का झाली? की, आमची एवढी कामे बाकी आहेत तर तुमचे लोन बाकी आहेत. त्यांनी ते बंद कसे केले? त्यांनी आपल्याला कधी कळवले आहे का? आपल्याजवळ ते पत्र आहे का?

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

साहेब, आपण त्यांना तसे कळवू.

**शशिकांत भोईर :-**

जेव्हा एम.एम.आर.डी.ए. ने कर्ज देणे बंद केले. आपल्या ॲग्रीमेन्टमध्ये तसे होते की, जसे तुम्ही काम करणार तसे तुम्ही बिले पुटअप करा. तुम्हांला पैसे मिळतील. बरोबर आहे. नंतर पाणी सुरु झाल्यानंतर लगेच त्यांनी बंद केले. तुम्हाला त्यांनी असे पत्राने कळवले आहे का? की, पाणी सुरु झाल्यामुळे आता तुम्हाला लोन देणार नाही.

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

त्यांनी तसे कळवले नाही.

**शशिकांत भोईर :-**

मग, तुम्ही हे कसे बोलता? आपल्या विभागातून कुठेतरी कामचोरपणा झालेला आहे आपली बिले पोहचली नाहीत. पाणी सुरु झाले नाही आणि तुम्ही सुद्धा हात वर केले आणि तुम्ही ठेकेदाराच्या पाठीवर हात ठेवला आहे आणि तुम्हाला भाववाढ मिळेल म्हणून ह्या पुढच्या कामाची पुर्तता केली नाही. आणि तुम्ही त्याच्याबद्दल ते लोन घेण्यासाठी काहीही पुर्तता केली नाही.

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

आमच्याकडे सोर्सपॉन्डस आहे. आम्ही तुम्हाला ते दाखवतो.

**शशिकांत भोईर :-**

आपण कसे दाखवणार? त्यांच्याकडून नंतर आपल्याला..... पण, ह्याचा फॉलअपच झाला नाही. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, ज्याप्रमाणे तुम्ही लेटर आणण्यासाठी फॉल अप केले तसे त्यांचा फॉल अपच झालाच नाही. ही एम.जी.पी. ची चुकी आहे. एम.जी.पी. चे अधिकार होते की, तो प्रोग्रेसिव्ह रिपोर्ट करुन, त्यांची बिले देवूनही कर्ज घेणे गरजेचे होते. ते तुम्ही केले नाही. तुम्ही तुमची चुकी सांगत नाही.

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

आम्ही पुष्कळ फॉलअप केले आहे. पाहिजे तर आम्ही तसे पत्रव्यवहार देवू.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही फक्त मा. स्थायी समितीच्या प्रत्येक सदस्यांना पत्रव्यवहार द्या. आमच्या महानगरपालिकेचे जेवढे सदस्य आहेत त्यांना दिले तरी चालेल त्याचप्रमाणे ......

**गीता जैन :-**

साहेब, पण जेव्हा करारनामा दिले आहे की, हे तुम्हाला मिळणार आणि ते तुम्हाला मिळाले नाही. तेव्हा तुम्ही ॲक्शन घेतली नाही का ? की, आमचे ॲग्रीमेन्ट झाले आहे. आणि तुम्ही ते ॲग्रीमेन्ट फॉलो करत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

पूर्ण भाईंदर महानगरपालिकेची आता ही स्किम आहे. इम्प्लिमेंटेशन ऑथोरिटी फक्त एन.जी.पी. आहे. एम.एम.आर.डी.ए. ने फॉन्ट डायरेक्ट एन.जी.पी. ला द्यायचे. पण, एम.एम.आर.डी.ए. ते फॉन्ट देत नाही. म्हणून आपली कामे राहिली. म्हणून आपण पाठपुरावा करुन मा. महासभेने निर्णय घेतला की, आपण निधी द्यावा. त्यांनी पत्रव्यवहार केला आहे. पण, एम.एम.आर.डी.ए. नी लोन दिले नाही.

**शशिकांत भोईर :-**

पण का दिले नाही त्याचे कारण तुम्ही विचारले नाही का ? महापालिकेने विचारले का? की का म्हणून देत नाही?

**शिवाजी बारकुंड :-**

आम्ही विचारणा केली. एम.जी.पी. चे अधिकारी आणि एम.एम.आर.डी.ए. शी चर्चा झाली. म्हणजे, पाणी पुरवठा सुरु झाला. त्यावेळी चंद्रशेखर साहेब होते. त्यांच्या खालचे अधिकारी होते. त्यांनी सांगितले की, एम.एम.आर.डी.ए. ची धारणा अशी आहे की, पाणी चालू झाले म्हणजे ती स्किम पूर्ण झाली. हे कुठल्या पेपरवर नाही. पण, मी सुद्धा गेलो होतो. तेव्हा त्यांनी सांगितले की, पाणी चालू झाले. म्हणजे, एम.एम.आर.डी.ए. चे म्हणणे होते की, ती स्किम पूर्ण होत गेली. त्यावेळे पासून श्री. पाटील साहेब नगराध्यक्ष होते. जशी स्किम होत गेली. तसे आपण २००२ पासून पाणी वाढवत गेलो आणि मग त्यांना वाटले की, आता स्किम पूर्ण झाली. एम.जी.पी. ने पाठपुरावा केला पण, त्यांना दिले नाही. महापालिकेची कामे रखडून आहेत. पाणी पुरवठा लवकर व्हावा, म्हणून मा. महासभेने ठराव केला आणि आपण निधी देणार आहे. हे ते तिघांचे मिळून आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, ह्यामध्ये मी थोडे विषयांतर करतो की, पाणी सुरु झाले. पाणी सुरु का करावे लागले. कारण, आपण त्या पाण्याचे पैसे भरत होतो. नागरिकांच्या पैशातून पाण्याचे पैसे भरत होतो. त्या पाण्याच्या पैशातून मुख्य लाईन जलवाहिनी टाकण्यांत आलेली आहे. मग, त्याच्यात पाणी घेणे गरजेचे आहे. कारण, आपण पैसे भरतो की, आपण पूर्ण स्मप झाले, पंप झाले, त्यानंतर सुरु करु, असे काही लिहिले होते का ?

**शिवाजी बारकुंड :-**

हे लिहिले नाही. शहराची निकड लक्षात घेता पाणी सुरु केले आहे.

**शशिकांत भोईर :-**

पण, तसे एम.एम.आर.डी.ए. नी सांगितले नाही की, तुम्हाला पाणी सुरु झाले म्हणून लोन बंद केले. ह्यांनी फॉलोअप केलेले नाही. ह्यांनी ठेकेदारांना पाठीशी घेतले होते. ठेकेदारांना भाववाढ मिळावी म्हणून ह्यांनी पाटीशी घालून त्यांनी तिकडे काम थांबवले आहे ह्यांच्यावर असा माझा स्पष्ट आरोप आहे. साहेब, त्यामुळे आपल्या महापालिकेला ह्याचा भुर्दंड सोसावा लागतो. साहेब, दुसरी आपली विकासाची कामे सोडून आपण पाण्यासाठी १० कोटी रु. पैसे देणार नव्हते.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब आल्यावर आपली बैठक झाली आहे ना......

**शशिकांत भोईर :-**

त्यांच्या चुकीमुळे आपल्याला नाहक खर्च पडला ना.

**रतन पाटील :-**

त्यांची चुकी आहे ना. तुम्ही त्यांना कशाला पाठीशी घालता ?

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, पाठिशी घालण्याचा प्रश्न नाही. समजा, एम.एम.आर.डी.ए. ने लोन दिले नाही. आपली ही स्किम आहे. एम.एम.आर.डी.ए. चे ११० कोटी रु. कर्ज आपणच फेडणार आहे. कर्ज घेतल्यानंतर जे आपणच फेडणार आहे. जर साहेब आल्यानंतर असा विरोध झाला की, वर्ष दिड वर्ष फंड मिळत नाही. साहेब बोलले की, एम.एम.आर.डी.ए. चे ११ टक्के व्याज आपण भरणार. त्याऐवजी जो महापालिकेचा निधी आहे. पाणी पुरवठ्यासाठी रिझर्व्ह फंड आहे. तो निधी वापरला तर आपला ११ टक्के व्याज वाचेल. त्यापासून ही सुरुवात झाली आणि मा. महासभेने मान्यता दिली. त्यापासून ह्याची सुरुवात झाली आणि इन बिटविन त्या ठेकेदाराचे जे आपण बोललात, ठेकेदार मागे लागले होते की, आमचे टेंडर टर्मिनेट करा. आजही ते मागे लागले आहेत. कारण, त्या रेटमध्ये ते परवडत नाही. महापालिकेचा प्रयत्न असा राहिला आहे. मी आल्यापासून, साहेब आल्यापासून ते जर टेंडर रद्द केले असते आणि परत नवीन टेंडर काढले असते तर साहेब, जवळ जवळ ३०-४० टक्के चा फरक झाला असता आणि त्यात महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले असते. म्हणून महापालिकेने प्रयत्न करुन आहे त्या ठेकेदाराकडून आहे त्या दराने काम करुन घ्यायला सांगितले आहे आणि साहेब, महापालिका निधी देणार आहे, एवढेच माझे म्हणणे आहे.

**शशिकांत भोईर :-**

आता आपले काम करायचे आहे तर महापालिकेला निधी द्यावाच लागेल. परंतु कुठे कामे चालू आहेत, कुठे कामे बंद झाली आहेत तर ती कामे का बंद झाली आहेत? आता गोडदेवचा स्मप आहे. तुम्ही म्हणता की, जागेचा प्रॉब्लेम आहे. जागेचा काय प्रॉब्लेम आहे? तो प्रॉब्लेम सोडवणे हे महापालिकेचे काम आहे की, एम.जी.पी. चे काम आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

महापालिकेने जागा पुरवायची होती.

**शशिकांत भोईर :-**

मग, जागेचा प्रॉब्लेम आहे. त्या जागेचा वाद आहे ही बाब तुम्ही महापालिकेच्या निदर्शनास आणले होते का? तुम्ही पत्रव्यवहार केला होता का?

**मा.आयुक्त :-**

पहिल्यांदा आपला जो अपूर्ण पाणी पुरवठा आहे तो पूर्ण करायच्या दृष्टीने जी जी कामे पूर्ण आहेत ती कामे आपण प्रथम सन्मा. सदस्यांना सांगा आणि त्याच्यामध्ये काय काय अडचणी येत आहेत तुमच्याकडून काय अडचण आहे किंवा महानगरपालिकेकडून काय अडचण आहे ते तुम्ही त्यांना अगोदर कळवा.

**शशीकांत भोईर :-**

साहेब, गोडदेवला १७ फाईल्स झालेल्या आहेत.

**रतन पाटील :-**

४० फाईल्स झालेले आहेत.

**शशीकांत भोईर :-**

४० फाईल्स झालेले आहे मग तेथील टाकीचा कुठला प्रॉब्लेम आहे की कसला वाद आहे? ते सांगा कारण पुढचे काम चालू झाले नाही.

**मा. आयुक्त :-**

सन्माननीय सदस्य शशीकांत भोईर साहेब, माझे म्हणणे असे आहे की, त्याच्या अडचणी काय आहेत हे तरी आपल्याला कळू दया. मग त्यामध्ये आपल्याला काही मार्ग काढता येईल ना,

**जयंत पाटील :-**

गोडदेवचा विषय घ्या.

**रतन पाटील :-**

त्यावेळस आपल्याला पाईल्स दिले... मी गोडदेवचाच विषय घेतो ज्यावेळस ४० पाईलींग तिथे मारले आहेत. त्याअर्थी त्या जागेला परवानगी आहे.

**राजन धारवड( प्रभारी कार्यकारी अभियंता) :-**

गोडदेवमध्ये आपल्याला जो प्लॅट दिलेला होता तो प्रायव्हेट आहे. त्यावेळी २००२ साली महानगरपालिकेचे लोक सुद्धा तेथे गेले होते. परंतु जो प्रायव्हेट माणूस आहे त्यांनी आपल्याला प्लॉट दिला नाही म्हणून आगोदर ३६ पाईल्स झालेले आहे आणि बाकीचे पाईप काढायचे राहीलेले आहे. त्यामुळे जोपर्यंत तो प्रायव्हेट प्लॉट आपल्या ताब्यात येते नाही तो पर्यंत काम सुरु करता येत नाही.

**मा. आयुक्त :-**

तुमचे जे ४० पाईल्स आता त्याठिकाणी घेतलेले आहे तो कोणाचा प्लॉट आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही जे ४० फाईल्स खोदायला घेतले आहे, ते कोणाच्या परवानगीने खादले, ते सांगा? तेथे कोणी खोदायला सांगीतले हे मला माहीत नाही. तुम्हाला कोणी तरी जागा दाखवली, महानगरपालिकेच कर्मचारीमध्ये नगरपालिकेच्या नगरसेवकांनी दाखविली म्हणून तुम्ही तेथे खोदली, ही वस्तुस्थिती खरी आहे का खोटी आहे ?

**शशीकांत भोईर :-**

काम करायला ते ए.टी.पी. विभाग असतील ना.....

**जयंत पाटील :-**

तुम्ही त्यांच्या म्हणण्याप्रमाणे करता, आपल्याकडे कुठल्याही तऱ्हेची जागेची परवानगी नाही. आपल्याला मालकांने जागेची परवानगी दिली नाही. तर आपण परस्पर कोणाच्या तरी सांगण्यावर तिथे जागा खोदलास का? आज हे नुकसान झालेले आहे. किंवा आज ते अडलेले आहे. त्याचे कारण ते आहे. तुम्ही म्हणता की, आम्हाला जागा मिळत नाही. मग तेथे जागा कशी खोदली? फायलिंग कसे झाले?

**मा. आयुक्त :-**

तो आता प्लॉट आपल्या ताब्यात आला आहे काय?

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता):-**

नाही, तो प्लॉट आपल्या ताब्यात आला नाही.

**मा. आयुक्त:-**

अजून नाही, मग, त्यांनी आपण त्याठिकाणी जे पायलिंग केले आहे. त्याला विरोध केला का?

**राजन धादवड (प्रभारी कार्यकारी अभियंता):-**

३ वर्षापासून ते काम बंद आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

ते काम बंद असल्यामुळे, तेथे कोणी माणूस जात नाही.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी जी पायलिंग केली आहे, ती पायलिंग महानगपालिकेने ठरवून दिलेल्या जागी केली आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

तात्कालीन त्यांना दाखविली आहे...

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य श्री शशीकांत भोईर साहेब, याबाबतीमध्ये मी सन्मा. सदस्यांना माझी विनंती अशी राहील की, योजना पुर्ण करण्याच्या दृष्टीने, पुर्ण करण्याच्या अनुषंगाने, आपण ज्या अडचणी आहेत त्या अडचणी समजून घेवू या. पुर्वी काम कसु सुरु झाले, का झाले? किंवा एखादे वेळी तुम्ही असाल किंवा मी नसेल, त्यावेही कोणी नसेल, समजा ते काम ४ वर्षा पुर्वी, ५ वर्षा पुर्वी सुरु झाले असेल, आज आपल्याला त्यातुन मार्ग काढणे म्हणजे, त्यावर चर्चा होणे तर आवश्यक आहे, पण, त्यातुन काहीमार्ग निघायला पाहीजे. कि, जेणे करुन आपली जी अपुर्ण स्कीम आहे, ती स्कीम आपणाला कशी पुर्णत्वाकडे नेता येईल. अशा प्रकारे आपण चर्चा करु या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

याठिकाणी सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब अध्यक्ष असताना त्यांनी ती जागा दाखविली मी जेव्ही हे त्यांना सांगीतले की, ती जागा प्रायव्हेट आहे. तुम्ही ती जागा कशाला दाखवता? तेव्ही ते म्हटले की, तुम्हाला माहीत नाही आणि त्यांना फुकटचे फायलिंग करायला लागले.

**जयंत पाटील:-**

ती जागा कोणाची आहे, शाळेची आहे की?

**तुळशीदास म्हात्रे :-**

ती जागा शाळेची नाही, शाळा झाल्यानंतर ती जाग दिली आहे.

**जयंत पाटील :-**

म्हणजे, ती जागा शाळेच्या ताब्यात दिली आहे, ना. शाळेने महानगरपालिकेला पत्र दिले आहे की, ती जागा महानगपालिकेने ताब्यात घ्यावी म्हणून असे पत्र दिले आहे. साहेब, ते खरे आहे का? तुम्ही आता फायलिंगचे काम करायला गेल्यानंतर आपल्याला तिकडे कोणी अडवले का?

**शिवाजी बारकुंड :-**

सध्या तर ते काम बंद आहे. ३ वर्षे काम बंद आहे आणि आपण जेव्हा पायलिंगचे काम केले होते, तेव्हा कोणी अडवण्याचा प्रयत्न केला नाही.

**शशीकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेबांचे म्हणण्याप्रमाणे हस्तांतरणासाठी आपण लेटर दिले होते, आपण ते फॉलोही केले होते. आणि आता पण ते काम सुरु आहे ना, पत्र दिले आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, त्यावेळी पत्र दिले असेल पण, ह्यापुर्वी जे अधिकारी होते, ते कोणीही नाही. आता नविन एम.जी.पी. चे अधिकारी आहेत. आणि आम्ही सुद्धा आहोत जर असे कुठेतरी पत्र आले असेल किंवा दिले असेल तर तुम्ही त्या पत्राची कॉपी आपण नविन प्रोसेस चालू करुन ती जागा ताब्यात घेवू

**जयंत पाटील :-**

महानगरपालिकेत शाळेचे पत्र आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही, महानगरपालिकेच्या डिपार्टमेंट मध्ये जावून बघा.

**जयंत पाटील :-**

आताच सन्मा. सदस्य श्री प्रफुल्ल पाटील साहेबाशी बोलणे झाले....

**मा. आयुक्त :-**

महानगरपालिकेकडे जर पत्र असेल तर, आपण शोध घेवू या, जर, समजा पत्र नसेल तर, ज्या संस्थेन पत्र दिले आहे, त्या संस्थेकडून आपण मागवून घेवू या.

**शशीकांत भोईर :-**

पत्र पुन्हा मागवून लवकरात लवकर काम सुरु करा.

**मा. आयुक्त :-**

आजच मागवून घेतो.

**शशीकांत भोईर:-**

त्याचे कारण काय आहे की, रस्ता बनविणे गरजेचे आहे. कारण ती उंचावर टाकी आहे.

**मा.आयुक्त :-**

हे जर पुर्वी केले असते तर आपल्यावर ही वेळ आली नसती.

**शशीकांत भोईर :-**

साहेब, पण हे केले नाही. हे काम आमचे नाही, हे प्रशासनाचे काम आहे.

**मा. आयुक्त :-**

३ वर्षा पुर्वी मी सुद्धा येथे नव्हतो.

**शशीकांत भोईर :-**

साहेब, ती काम प्रशासनाचे आहे.आता तुम्ही जो निर्णय घेतला आहे. तो योग्य घेतला आहे. ते काम आजच करा.

**मा. आयुक्त :-**

ज्या संस्थेने त्या जागेचे पत्र दिले आहे. त्या संस्थेकडे तुम्ही आता माणूस पाठवा आणि त्यांच्याकडून ते पत्र ताबडतोब मागवून घ्या आणि ते जर पत्र दिले असेल तर त्यांना काम करायला काहीही अडचण नाही.

**जेन्वी आल्मेडा :-**

मी उत्तनच्या संदर्भात बोलते आपण उत्तनला पाईप टाकली आहे. तर ती पाईप अर्धवट ठेवली आहे. ते काम एवढे स्लो मोशनमध्ये का आहे?

**हंसुकुमार पांडे :-**

जेसलपार्कच्या टाकीच्या स्मपची काही प्रोसीजर आहे की नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

२०० मी.ली लिटर टाकीचे काम बाकी आहे, थोडा वेळ दया.

**जेन्वी आल्मेडा :-**

पण, ते काम स्लो मध्ये आहे. त्यासाठी किती वेळ लागेल ते ठोस सांगा.

**शिवाजी बारकुंड :-**

यावेळेत होईल.

**जेन्वी आल्मेडा :-**

ह्या वेळेत म्हणजे कीती ? तिथेच मी राहते आणी आम्हाला न कळवता तिथे पावर गेली त्यामुळे लाकांची बोंबाबोंब झाली तेव्ही मग धावपळ केली तुम्ही तेथे खोदुन तसेच टाकले होते. त्यामुळे शार्ट सर्कीट झाले आणि तुमचा कुठे ठावठिकाणा नव्हता.

**रोहीदास पाटील :-**

२७ दिवस तुमची बस बंद केली काही काम करते वेळी तुम्ही थोडेतरी ताळतंत्र वापरायला पाहीजे.

**जेन्वी आल्मेडा :-**

जनतेची किती गैरसोय झाली.

**रोहीदास पाटील :-**

जी अत्याआवश्यक सेवा आहे.त्यावेळी तुम्ही अधिकारी म्हणून काम करता, तुमचे या शहराशी नाते आहे. किंवा आपण हे काम करते वेळी लोकांना काही त्रास होवू नये ह्याची दक्षता घेतली पाहीजे.

**मा. आयुक्त :-**

एक नोट आम्हाला तयार करुन द्या आणि ह्याच्यापुढे मात्र की, एका महिन्यानंतर जेव्हा आपण याठिकाणी बसू एकत्र स्थायी समिती समोर चर्चेला येऊ तेव्हा मग तुमच्या कामाची प्रगती त्याच्यामध्ये दिसली पाहिजे किंवा काय काम झाले आणि ती काम मार्गी लागण्यासाठी आपण काय प्रयत्न केले.

**रतन पाटील :-**

आपण उत्तर देणार असाल तर सध्या मा. महासभेमध्ये विषय घ्या की, हे जे पम्प आणि सम्प आणलेले आहे ते एम.जी.पी. कडे जमा आहे की भिवंडीच्या कुठल्यातरी गोंडाऊनमध्ये आहे असा प्रश्न मा. महासभेमध्ये उपस्थित झालेला होता. कोणीतरी उत्तर दिले की, ते भिंवडीच्या गोडाऊनमध्ये जमा आहेत.

**शिवाजी बारकुंड :-**

एम.जी.पी च्या ताब्यात आहे.

**एस. ए. खान :-**

मिरारोड येथे अस्मितामध्ये पम्प लावलेले आहे आणि अजूनही ते चालू नाही. तीन पम्प लावले आहेत आणि त्याला चार वर्षे झाली आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एम.जी.पी ही जी संस्था आहे ही जी ११० करोड रुपयाची योजना आहे ती तुम्ही करत आहात तुम्ही ह्याच्यामध्ये प्रॉफीट कमवितात की नाही?

**रतन पाटील :-**

प्राफीट नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

फक्त एक्झीबिशन तुम्ही प्रॉफीट कमवत नाही. ही योजना सुमारे ५-६ वर्षापासून सुरू आहे. ही योजना तुम्हाला कधीपर्यंत कम्पलीट करायची होती?

**रतन पाटील :-**

२००३ पर्यंत कम्प्लीट करायची होती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग हा जो डिले झाला. एम.एम.आर.डी.ए. चा फंडस् नसल्यामुळे आपण हा जो डिले केलेला आहे. पण आता आमच्या महापालिकेतर्फे तुम्हाला फंडस् ची व्यवस्था केलेली आहे तर तुम्ही आम्हाला एक शॉर्ट टिपणी राईटिंगमध्ये द्या की, अजूनपर्यंत ही ५० एम.एल.डी. ची स्कीम काय होती आणि आता कुठंपर्यत आलेली आहे आणि आता ह्याचे एक्झीबेशन आपण कितपर्यंत करणार आहात. त्याच्यानंतर एव्हरी १५ दिवसानंतर तुम्ही आम्हाला प्रोग्रेस रिपोर्ट दिला पाहिजे. त्यानंतर तुमचे जे कॉन्ट्रक्टर आहेत त्यांना तुम्ही वॉर्निंग द्या की, कोणत्याही परिस्थितीत काम थांबले नाही पाहिजे. कारण ज्याप्रमाणे तुमच्याकडे कॉन्ट्रक्टर आहेत त्याप्रमाणे आमच्या महापालिकेकडे ही कॉन्ट्रक्टर आहेत त्यांनी अशी भरपूर कामे केली आहेत आणि आजही त्यांची बिल पेन्डींग आहेत तरीसुद्धा काम चालू आहेत. तसे तुम्ही त्यांना सांगायला पाहिजे की, काम चालू ठेवायला पाहिजे. काम बंद करायला नको. आम्ही तुम्हांला पेमेन्ट फास्ट करण्याचा प्रयत्न करतो. पण तुम्ही काम बंद नाही केले पाहिजे. त्याच्यानंतर तुम्ही टारगेट देणारच व विहीत १५ दिवसामध्ये रिपोर्ट द्या आणि आपण आता प्रभारी कार्यकारी अभियंता आहेत व ह्याच्यावर तुमचे जे एक्झीक्युटीव्ह इंजिनियर आहेत, सिटी इंजिनियर आहेत त्यांना ही तुम्ही सभेमध्ये बोलवा. कारण डिसीजन टेकींग ॲन्युअल पे त्यांच्याकडे आहे. तुमच्याकडे नाही. समजा तुम्ही हा डिसीजन दिला आणि त्यांनी तो डिसीजन एक्सेप्ट केला नाही तर प्रॉब्लेम व्हायला नको. आज १७ तारीख आहे आणि बरोबर ३१ मे रोजी आपण कृपया आपल्या ह्या डायरीमध्ये लिहून घ्या.

**रोहिदास पाटील :-**

आमची सभा असू दे, नसू दे. आपण आयुक्तांच्या दालनामध्ये बसू अन्यथा ह्याच सभागृहाची परवानगी घेऊन इथे बसू. मी असा प्रश्न विचारतो की, हे झाले ५० एम.एल.डी. चे जूने आता आपण आम्हाला नविन काहीतरी देताना त्याचे काय? नविन ३० एम.एल.डी. बरोबर तुमचा काही संबंध आहे का?

**मा. आयुक्त :-**

३५ एम.एल.डी. च्या बाबतीमध्ये तुम्हाला मी सांगतो. आपण ३५ एम.एल.डी. चे प्रपोझल त्यांच्याकडे टेक्निकल स्क्रुटनीसाठी पाठविलेले आहे आणि स्क्रुटनीचा जो चेक द्यायचा होता तो कालच आपण त्यांच्यापर्यंत पोहचवलेला आहे आणि माझ्या माहितीप्रमाणे साधारण २-४ दिवसामध्ये आपल्याला टेक्निकल सॅक्शन मिळेल. टेक्निकल सॅक्शन मिळाले तर आपण लगेच टेंडर काढणार आहोत. आपण काम काढणार.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे ही अशी माहिती मिळाली की, नाही. नाहीतर आम्ही समजणार की, एम.जी.पी. काम करणार.

**जेन्वी अल्मेडा :-**

प्रकरण क्र. ३२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.

**एस. ए. खान :-**

सदर ठराव को मेरा अनुमोदन है।

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ३२ :-**

मे. बायोटेक मिरा यांचेतर्फे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर उभारण्यात येणाऱ्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पकरिता आवश्यक यंत्रसामुग्री व साहित्यावर आकारण्यात येणाऱ्या जकात कराबाबत.

**ठराव क्र. :-**

मे. बायोटेक मिरा यांचेतर्फे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर उभारण्यात येणाऱ्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पकरिता आवश्यक यंत्रसामुग्री व साहित्यावर आकारण्यात येणाऱ्या जकात कराबाबत हा विषय आलेला आहे. सदर कंपनीने त्यांनी आणलेल्या यंत्रसामुग्री व साहित्यावर जकात कर भरणा केलेला असल्याने हा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. जेन्वी अल्मेडा** **अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्या, सन्मा. सदस्य, मनपा कर्मचारी वर्ग, मनपा अधिकारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची ही सभा संपल्याचे जाहीर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :-**

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका